
# कोरहचा बंड

एड्रियन एबेन्स द्वारे



कोरहचा बंड

ही पुस्तिका तयार करण्यात मदत केल्याबद्दल
रुबेन, डॅनियल आणि ब्रायन यांचे विशेष आभार.

Printed by

maranathamedia.com

ऑगस्ट 28, 2025

ह्या पुस्तकाचे मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ साळवी ह्यांनी केले आहे. तसेच पुनर्वाचनासाठी ताई कृतिका निकाळजे ह्यांनी मदत केली आहे.

# सामग्री


जिवंतपणे खड्ड्यात उतरणे ........ 4
बंडाला कारणीभूत घटक ........ 5
मोशेविरुद्ध आरोप ........ 6
मोशेला आरोपांबद्दल वाईट वाटले ........ 9
मोशेसाठी एक वधस्तंभ ........ 10
कोरह, दाथान आणि अबीराम यांचा नाश झाला ........ 12
विध्वंसक विरुद्ध पुनर्स्थापक ........ 13
देवाच्या न्यायाची प्रक्रिया ........ 14
हात पुढे करणे ........ 15
देवाचा चेहरा लपवणे ........ 16
जर बद्दलचा प्रश्न ........ 17
विरुद्ध तत्वांची समस्या ........ 21
देवाची अग्नी ........ 23
इस्राएलाच्या मंडळीला वाचवण्याचा प्रयत्न करणे ........ 27
मोशेच्या कार्याचे श्रेय सैतानाच्या प्रतिनिधित्वाला देणे ........ 29
शत्रूच्या हाती ........ 31

# जिवंतपणे खड्ड्यात उतरणे

कोरहाच्या वंशजांसाठी स्तोत्र ८८ मधील शब्दांचा अर्थ बहुतेकांच्या लक्षात येण्यापेक्षा खूपच खोल आहे.

स्तोत्रसंहिता ८८:२-८ माझी प्रार्थना तुझ्यापुढे सादर होवो; माझ्या विनवणीकडे तुझा कान असू दे; कारण माझा जीव क्लेशांनी व्यापला आहे; माझा प्राण अधोलोकाजवळ जाऊन पोहचला आहे. गर्तेत पडणाऱ्यांत माझी गणना झाली आहे; मी निराधार वीरासारखा झालो आहे; मला प्रेतांमध्ये टाकले आहे; वध होऊन जे कबरेत पडले आहेत, ज्यांची आठवण तू कधी करीत नाहीस, ज्यांचा तुझ्या हाताचा आधार तुटला आहे, त्यांच्यासारखा मी झालो आहे. गर्तेच्या अगदी तळाशी, अंधकारमय स्थली, खोल डोहात तू मला टाकले आहेस. तुझ्या संतापाचा भार माझ्यावर पडला आहे, तू आपल्या सर्व लाटांनी मला पिडले आहेस. (सेला) तू माझ्या परिचितांना माझ्यापासून दूर केले आहेस, त्यांना माझा वीट येईल असे तू मला केले आहेस; मी कोंडलेला आहे, माझ्याने बाहेर निघवत नाही.

कोरह आणि त्याच्या साथीदारांची गोष्ट ही बंडखोरीची किंमत किती मोठी असते याची ठळक आठवण करून देते. कोरहाच्या मुलांसाठी ही एक फारच कठीण गोष्ट असली पाहिजे की त्यांना काइन आणि बलाम यांच्यासारख्या वारशात जगावे लागले.

यहूदा १:११ त्यांची केवढी दुर्दशा होणार! कारण ते काइनाच्या मार्गाने चालले, द्रव्यासाठी बलामाच्या भ्रांतिमार्गात बेफामपणे घुसले आणि कोरहासारखे बंड करून त्यांनी आपला नाश करून घेतला.

स्तोत्र ८८ हे कोरहाच्या मुलांपैकी एका मुलाने लिहिले होते, आणि त्यातील या शब्दांत किती वेदना दडलेल्या असतील याची आपण फक्त कल्पना करू शकतो “मी त्या लोकांत मोजला जातो, जे खड्ड्यात उतरतात.” जरी या लेखकाने आपल्या पूर्वजाच्या बंडात कधीही भाग घेतला नव्हता, तरी त्याला नेहमीच आठवण करून दिली जात असे की त्याचे कुटुंब हे बंडखोरांविरुद्ध देवाच्या क्रोधाची एक जिवंत आणि सततची आठवण आहे. म्हणूनच हे अगदी योग्य आहे की हे शब्द ख्रिस्तालाही लागू होतात ज्याने आपला वारसा स्वतःवर घेतला आणि जो खड्ड्यात उतरलेल्या लोकांत मोजला गेला.

मग चला, आपण कोरहाची कथा अभ्यासू या, जेणेकरून आपल्याला देवाच्या न्यायाबद्दल ती काय शिकवते ते समजू शकेल.

गणना १६:१-११ कोरह बिन इसहार बिन कहाथ बिन लेवी आणि रऊबेन वंशातील अलीयाबाचे मुलगे दाथान व अबीराम आणि ओन बिन पेलेथ हे इस्राएलातील अडीचशे लोकांना बरोबर घेऊन मोशेविरुद्ध उठले; हे लोक सरदार असून मंडळीचे प्रतिनिधी व

नामांकित पुरुष होते. ते मोशे व अहरोन ह्यांच्याविरुद्ध जमा होऊन त्यांना म्हणाले, “तुमचे आता फारच झाले! सबंध मंडळी पवित्र आहे, तसेच प्रत्येक मनुष्य पवित्र आहे आणि परमेश्वर त्यांच्याठायी आहे; तर मग तुम्ही परमेश्वराच्या मंडळीवर वर्चस्व का गाजवता?” हे ऐकून मोशे पालथा पडला; मग तो कोरह व त्याचे साथीदार ह्यांना म्हणाला, “परमेश्वराचे कोण व पवित्र कोण हे परमेश्वर उद्या सकाळी दाखवील व त्यांना आपल्याजवळ येऊ देईल; ज्याला तो निवडील त्याला तो आपल्याजवळ येऊ देईल. आता असे करा. कोरहा, तू आणि तुझे सर्व सोबती धुपाटणी आणा; आणि उद्या त्यांत अग्नी ठेवून परमेश्वरासमोर धूप जाळा; मग परमेश्वर ज्या मनुष्याला निवडून घेईल तोच पवित्र ठरेल; लेवीच्या वंशजांनो, तुमचे आता फार झाले.” तेव्हा मोशे कोरहाला म्हणाला, “लेवीच्या वंशजांनो ऐका; तुम्ही परमेश्वराच्या निवासमंडपाची सेवा करावी आणि मंडळीची सेवा करण्यासाठी तिच्यासमोर उभे राहावे म्हणून परमेश्वराने तुम्हांला आपल्याजवळ येऊ दिले; ह्या कार्यासाठी इस्राएलाच्या देवाने तुम्हांला इस्राएल लोकांच्या मंडळीतून वेगळे केले आहे हे काय थोडे झाले? तुला व तुझ्या सर्व लेवीय भाऊबंदांना परमेश्वराने आपल्याजवळ घेतले असले तरी याजकपदही तुम्ही मिळवू पाहता काय? ह्यावरून तू व तुझे सर्व साथीदार परमेश्वराच्या विरुद्ध जमलेले आहात, हे स्पष्ट होते. अहरोन तो काय की तुम्ही त्याच्याविरुद्ध कुरकुर करावी?”

## बंडाला कारणीभूत घटक

कोरह आणि त्याचे सहकारी कटकर्ते हे असे लोक होते ज्यांना देवाच्या सामर्थ्याचे आणि महानतेचे विशेष प्रगटीकरण पाहण्याचा मान मिळाला होता. ते त्या लोकांपैकी होते जे मोशेसोबत डोंगरावर गेले होते आणि त्यांनी देवाचे तेज प्रत्यक्ष पाहिले होते. (RH, 12 नोव्हेंबर, 1903)

पण तरीही, त्यांच्या तंबूंमध्ये उभे राहून कोरह जो या बंडाचा मुख्य उकसवणारा होता आणि त्याचे समर्थक असे वागत होते जणू ते देवाच्या कोपाचा धिक्कार करत आहेत, जणू देवाने आपला सेवक मोशेद्वारे कधी काही केलेच नाही. आणि याहूनही अधिक म्हणजे, हे बंडखोर असे वागत होते जणू त्यांना नुकतेच मिळालेल्या त्या विशेष सन्मानाचा विसर पडला होता म्हणजे मोशेसोबत देवाच्या जवळजवळ थेट उपस्थितीत नेले जाणे, आणि त्याचे अतुलनीय तेज पाहणे. या लोकांनी स्वतः पाहिले होते की मोशे जेव्हा दुसऱ्यांदा दगडी पट्ट्या घेऊन डोंगरावरून खाली आला, तेव्हा त्याचा चेहरा देवाच्या तेजाने इतका उजळला होता की लोक त्याच्याजवळ जायला धजत होते. (3T 354)

कोरह आपल्या पदावर समाधानी नव्हता. तो तंबूच्या सेवेशी जोडलेला होता, तरीही त्याला याजकपदावर चढवले जावे अशी महत्त्वाकांक्षा होती. देवाने मोशेला प्रमुख शासक म्हणून नेमले होते, आणि याजकपद अहरोन व त्याच्या पुत्रांना दिले होते. परंतु कोरहने ठरवले की मोशेने ही व्यवस्था बदलली पाहिजे, जेणेकरून त्याला याजकपदाचा सन्मान मिळेल. आपला हेतू निश्चित साध्य व्हावा म्हणून त्याने रूबेनच्या वंशातील दातान आणि अबीराम यांनाही आपल्या बंडात ओढले. (3T 344)

कोरहच्या बंडामध्ये आपण पाहतो की स्वर्गात सैतानाने केलेल्या बंडाच्या त्याच आत्म्याचे प्रकटीकरण होते, पण ते एका लहान स्तरावर, घडून आले. अभिमान आणि महत्त्वाकांक्षा ह्यामुळेच ल्युसिफरने देवाच्या राज्यव्यवस्थेबद्‌दल तक्रार केली आणि स्वर्गात स्थापन केलेली व्यवस्था उलथवून टाकण्याचा प्रयत्न केला. (PP 403)

मग प्रश्न असा उभा राहतो की कोरहच्या या बंडखोर प्रवासाचा मार्ग कोणत्या गोष्टीने मोकळा केला?

त्यांना ही भयंकर शिक्षा मान्य करायची नव्हती की त्यांना सर्वांना वाळवंटातच मरावे लागणार आहे. त्यामुळे ते प्रत्येक कारणाला धरून बसायला तयार झाले, जेणेकरून ते स्वतःला पटवू शकतील की त्यांना चालवणारा आणि त्यांच्या नाशाचा निर्णय करणारा देव नसून मोशेच आहे. (PP 396)

लोकांच्या कुजबुजण्यामुळे त्यांच्यावर देवाचा कोप आला आहे हा आरोप चुकीचा आहे, असे सांगण्यात आले. त्यांनी म्हटले की मंडळी कसलीही दोषी नाही, कारण त्यांनी फक्त आपले हक्क मागितले होते; पण मोशे हा दडपशाही करणारा शासक आहे; त्याने लोकांना पापी म्हणून धिक्कारले, जेव्हा प्रत्यक्षात ते एक पवित्र लोक आहेत आणि परमेश्वर त्यांच्या मध्ये आहे. (PP 397)

कोरहने त्यांच्या वाळवंटातील प्रवासाचा इतिहास लोकांसमोर मांडला जिथे त्यांना संकटात टाकले गेले होते, आणि त्यांच्या कुजबुजण्यामुळे व अवज्ञेमुळे अनेक लोक नाश पावले होते. त्याचे ऐकणाऱ्यांना असे वाटले की जर मोशेने वेगळा मार्ग अवलंबला असता तर त्यांचे हे सर्व संकट टाळता आले असते. त्यांनी ठरवले की त्यांच्या सर्व आपत्तींसाठी मोशेच जबाबदार आहे, आणि त्यांना कानान भूमीपासून दूर ठेवण्यात आले आहे ते देखील मोशे आणि अहरोन यांच्या चुकीच्या कारभारामुळेच झाले आहे. (PP 397)

## मोशेविरुद्‌ध आरोप

मोशेद्वारे झालेले चमत्कार कोरहने कशाला जोडले?

पण कोरह आणि त्याचे साथीदार यांनी प्रकाश नाकारत नाकारत शेवटी इतके अंध झाले की देवाच्या सामर्थ्याची सर्वात प्रभावी प्रगटीकरणेसुद्धा त्यांना पटवण्यासाठी पुरेशी ठरली नाहीत; त्यांनी ती सर्व मानवी किंवा सैतानी सामर्थ्यामुळे घडली असे मानले. (PP 405)

कोरह आणि त्याचे साथीदार हे असे लोक होते ज्यांना देवाच्या सामर्थ्याचे आणि महानतेचे विशेष प्रगटीकरण पाहण्याचा मान मिळाला होता. ते त्या लोकांपैकी होते जे मोशेसोबत डोंगरावर गेले होते आणि त्यांनी देवाचे तेज प्रत्यक्ष पाहिले होते. पण त्या वेळेनंतर एक बदल घडून आला. एक प्रलोभन सुरुवातीला अगदी किरकोळ त्यांनी मनात जपून ठेवले; आणि त्याला प्रोत्साहन दिल्यामुळे ते अधिकाधिक बळकट झाले, इतके की त्यांच्या मनांवर सैतानाचे नियंत्रण आले, आणि त्यांनी बंडखोरीचे काम हाती घ्यायचे धाडस केले. लोकांच्या भरभराटीबद्दल आपल्याला मोठी काळजी आहे असा दिखावा करून, त्यांनी प्रथम आपली असमाधानी कुजबुज एकमेकांमध्ये पसरवली, आणि नंतर इस्राएलामधील प्रमुख लोकांमध्येही पसरवली. त्यांच्या या सूचक आरोपांना इतका सहज प्रतिसाद मिळाला की त्यांनी अजून पुढे जाण्याचे धाडस केले; आणि शेवटी ते स्वतःही यावर विश्वास ठेवू लागले की आपण खरोखर देवासाठी उत्साहाने कार्य करीत आहोत. (RH, 12 नोव्हेंबर, 1903)

हेवा आणि जंगलात त्यांच्या पापामुळे ते सर्व मरतील, या देवाच्या निकालाला स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे, कोरह आणि त्याच्या साथीदारांनी सर्व गोष्टींचे गैरव्यवस्थापन केल्याचा दोष मोशेवर ठेवला आणि त्याच्यावर मानवी किंवा सैतानी सामर्थ्याने कार्य करण्याचा आरोप केला. आपण पाहतो की, डोंगरावर प्रकट झालेल्या देवाच्या तेजाच्या प्रगटीकरणाला कोरहने देवाकडून आलेले न मानता सैतानी किंवा मानवी स्रोताकडून आलेले मानले. या खोटेपणामुळे हे उघड झाले की ते पूर्णपणे सैतानाच्या ताब्यात गेले होते. कोरह याजकपदाची इच्छा बाळगत होता, म्हणून त्याने प्रधानयाजक असलेल्या अहरोनावर हल्ला केला आणि त्याच्यावरील विश्वास ढासळवण्याचा प्रयत्न केला. यात कोरहला मोठे यश मिळाले. लोकांना असे पटवून देण्यात ते यशस्वी झाले की ते संकटात सापडले आहेत ते त्यांच्या स्वतःच्या चुकीमुळे नाही, तर मोशे आणि अहरोन यांच्या चुकीमुळे आहे.

लोक जेव्हा अंधारात आणि चुकीच्या मार्गावर असतात, आणि प्रत्यक्षात जेव्हा त्यांना

ताडना मिळायला हवी असते, तेव्हा त्यांचे कौतुक आणि खुशामत करण्यात त्यांना याहून अधिक काहीच आनंददायक वाटत नाही. कोरहने मोशेला गर्विष्ठ आणि दडपशाही करणारा नेता म्हणून सादर करून लोकांचे लक्ष वेधले आणि नंतर त्यांची सहानुभूती मिळवली. त्याने म्हटले की मोशे खूप कठोर आहे, फार मागण्या करणारा आहे, हुकूमशाही वृत्तीचा आहे, आणि तो लोकांना अशा रीतीने ताडतो जणू ते पापी आहेत; पण खरे तर ते तर पवित्र लोक आहेत, परमेश्वरासाठी पवित्र केलेले आहेत, आणि परमेश्वर स्वतः त्यांच्या सोबत आहे. कोरहने त्यांच्या जंगलातील प्रवासातील प्रसंग पुन्हा सांगितले कसे ते कठीण परिस्थितीत आले, कसे त्यांच्या कुरकुरीमुळे आणि अवज्ञेमुळे त्यांच्यातील बरेच लोक मेले. त्यांच्या विपर्यस्त विचारसरणीमुळे त्यांना असे वाटले की जर मोशेने दुसरा मार्ग धरला असता तर त्यांच्या सगळ्या अडचणी टाळल्या गेल्या असत्या. तो खूपच कठोर, खूपच मागणी करणारा होता, आणि म्हणून त्यांनी ठरवले की जंगलातील त्यांच्यावर आलेल्या सर्व आपत्तींसाठी मोशेच जबाबदार आहे. कोरह हा मुख्य प्रवर्तक होता आणि त्यांच्या परीक्षांचे व क्लेशांचे खरे कारण ओळखण्यात स्वतःला फार मोठ्या शहाणपणाचा मालक असल्याचे दाखवत होता.

या बंडखोरीच्या कार्यात, आधी कधी नव्हती इतकी विसंवादी घटक आणि मतांची भावना व सुसंवाद निर्माण झाले. इस्राएलाच्या मंडळीतील बहुसंख्य लोकांना आपल्या बाजूला खेचण्यात मिळालेल्या यशामुळे कोरहला खात्री वाटली की तो शहाणा आहे, त्याचा निर्णय योग्य आहे, आणि खरोखरच मोशे असा अधिकार घेत आहे जो इस्राएलाच्या समृद्धीला आणि तारणाला धोका निर्माण करतो. त्याने दावा केला की देवाने त्याला हे प्रकरण उघड केले आहे आणि इस्राएलाच्या राज्यव्यवस्थेत बदल घडवून आणण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकली आहे आणि तेही उशीर होण्याआधी. त्याने सांगितले की मंडळी दोषी नाही; ते धर्मी आहेत. मंडळीच्या कुरकुरीमुळे त्यांच्यावर देवाचा कोप येतो, असा जो मोठा गाजावाजा केला जात आहे तो सगळा चुकीचा आहे. लोक तर फक्त आपले हक्क मागत होते; त्यांना वैयक्तिक स्वातंत्र्य हवे होते. (3T 345, 346)

मोशेने दाथान आणि अबीराम यांना त्याच्याकडे येण्याची विनंती केली तेव्हा आरोप चालूच राहिले.

गणना १६:१२-१४ मोशेने अलीयाबाचे मुलगे दाथान व अबीराम ह्यांना बोलावणे पाठवले; पण ते म्हणाले, "आम्ही येत नाही; दुधामधाचे प्रवाह वाहणाऱ्या देशातून काढून तू आम्हांला ह्या रानात मारून टाकण्यासाठी आणलेस हे काय थोडे झाले

म्हणून तू आमच्यावर अधिकारही गाजवतोस? शिवाय, दुधामधाचे प्रवाह वाहणाऱ्या देशात तू आम्हांला मुळीच आणलेले नाहीस अथवा शेते व द्राक्षमळे ह्यांचे वतन आम्हांला दिलेले नाहीस. ह्या लोकांच्या डोळ्यांत तू धूळ फेकतोस काय? आम्ही येत नाही.”

कोरह, दाथान आणि अबीराम यांनी लोकांसमोर काहीतरी कारण सांगणे आवश्यक होते की मोशेने सुरुवातीपासून इस्राएलच्या मंडळीबद्दल इतकी विशेष काळजी का दाखवली. त्यांच्या स्वार्थी मनांना, जी सैतानाची साधने बनून भ्रष्ट झाली होती, असे सुचले की आता त्यांना मोशेच्या या उघड वाटणाऱ्या काळजीमागील खरा हेतू सापडला आहे. त्याने त्यांना जंगलात भटकत ठेवायचे ठरवले होते, जोपर्यंत ते सारे, किंवा जवळजवळ सारेच, नष्ट होत नाहीत; आणि मग तो त्यांच्या संपत्तीचा वारस व मालक व्हावा. (3T 346)

हे लोक प्रत्यक्षात सैतानाची साधने होती, आणि त्यांनी संयमी व निःस्वार्थी मोशेवर संपूर्णपणे स्वार्थी हेतू असल्याचा आरोप केला. देवाच्या कार्यासाठी ज्याने सर्वस्व त्यागले, त्याच्या हृदयाला या गोष्टींनी अतिशय खोलवर जखम केली.

गणना १६:१५ तेव्हा मोशेचा कोप भडकला. तो परमेश्वराला म्हणाला, “त्यांच्या अर्पणाची दखल घेऊ नकोस; मी त्यांचे एक गाढवही घेतलेले नाही.”

## मोशेला आरोपांबद्दल वाईट वाटले

मजकूरात लिहिले आहे की मोशेचा "कोप भडकला", पण हिब्रू शब्दाचा अर्थ "दुःखित" किंवा "व्यथित" असाही होऊ शकतो. शौलविषयी शमुवेलाची प्रतिक्रिया लक्षात घ्या तिथेही याच हिब्रू शब्दाचा उपयोग केला आहे.

१ शमुवेल १५:११ “मी शौलाला राजा केले ह्याचा मला पस्तावा होत आहे; कारण मला अनुसरण्याचे सोडून देऊन त्याने माझ्या आज्ञा पाळल्या नाहीत.” ह्यावरून शमुवेलाला संताप आला व तो रात्रभर परमेश्वराचा धावा करत राहिला.

एलेन व्हाईट सांगतात की मोशे "फार हलला" होता, रागावलेला नव्हता; आणि त्यामुळेच या वचनातील "क्रोधित" या शब्दासाठी "दुःखित" हा अर्थ योग्य ठरतो.

अन्यायकारक आरोपांमुळे मोशे अतिशय व्यथित झाला. त्याने लोकांसमोर देवाला आळवले की त्याने कधीही मनमानीपणे वागले आहे का, आणि देवानेच त्याचा न्याय

करावा अशी त्याने विनंती केली. लोक सर्वसाधारणपणे असंतोषाने भरलेले होते आणि कोरहच्या खोट्या आरोपांमुळे व विकृत सादरीकरणामुळे प्रभावित झाले होते. (3T 348)

मोशे ख्रिस्ताच्या दुःखांमध्ये सहभागी होत होता. कोरह, दाथान आणि अबीराम यांची कृत्ये ही सैतानाने प्रेरित केलेली निर्दयी कामे होती, जी त्याच्या स्वतःच्या अनुभवातून स्वर्गात देवपुत्राविरुद्ध केलेल्या बंडातून उगम पावली होती.

गणना १६:१६-१९ मग मोशे कोरहाला म्हणाला, “उद्या तू आपल्या साऱ्या साथीदारांबरोबर परमेश्वरासमोर हजर हो; तू, ते व अहरोन तुम्ही सर्व आपली धुपाटणी घेऊन त्यात धूप घाला; प्रत्येकी एक धुपाटणे ह्याप्रमाणे दोनशे पन्नास धुपाटणी परमेश्वरासमोर आणावीत; तू व अहरोन ह्यांनीही आपापले धुपाटणे आणावे.” तेव्हा त्यांनी आपापले धुपाटणे आणून त्यात विस्तव ठेवला व त्यावर धूप घातला, आणि मोशे व अहरोन ह्यांच्याबरोबर ते दर्शनमंडपाच्या दाराजवळ उभे राहिले. कोरहाने त्यांच्याविरुद्ध सगळी मंडळी दर्शनमंडपाच्या दाराजवळ जमवली, तोच परमेश्वराचे तेज सर्व मंडळीला दिसले.

त्यांनी मोशेवर असा आरोप केला की तो जणू दैवी मार्गदर्शनाखाली वागत असल्याचे भासवत आहे, जेणेकरून आपला अधिकार प्रस्थापित करता येईल; आणि त्यांनी जाहीर केले की ते आता पुढे आंधळ्यांसारखे त्याच्या मागे फिरत राहणार नाहीत कधी कनानकडे, तर कधी जंगलाकडे जसे त्याच्या महत्त्वाकांक्षी योजना पाहून त्याला योग्य वाटेल तसे. अशा प्रकारे जो मोशे एक कोमल पिता, एक संयमी मेंढपाळ होता, त्याला सर्वात काळ्या स्वरूपात एक क्रूर अत्याचारी आणि सत्तेवर बळजबरीने कब्जा करणारा म्हणून दाखवले गेले. कनानमधून वगळले जाणे जे त्यांच्या स्वतःच्या पापांची शिक्षा होती तेही त्याच्यावर दोष म्हणून टाकले गेले. (PP 399)

गरीब मोशे इस्राएलाच्या मुलांसाठी त्याने जे काही केले होते त्यानंतरही, शास्त्र असे सांगते की संपूर्ण मंडळी त्याच्याविरुद्ध आणि अहरोनाविरुद्ध एकत्र जमली.

## मोशेसाठी एक वधस्तंभ

पुढे काय होते ते आपण काळजीपूर्वक लक्षात घेऊया.

गणना १६:२०-२१ परमेश्वर मोशे व अहरोन ह्यांना म्हणाला, “तुम्ही ह्या मंडळीतून वेगळे व्हा, म्हणजे एका क्षणात मी त्यांना भस्म करतो.”

हे विधान देवाने सोन्याच्या वासराच्या पापाबद्दल जे म्हटले त्याच्यासारखेच आहे.

निर्गम ३२:१० तर आता मला आड येऊ नकोस; मी आपला कोप त्यांच्यावर भडकवून त्यांना भस्म करतो; आणि तुझेच एक मोठे राष्ट्र करतो.”

यामध्ये प्रभूचा काय उद्देश होता?

त्यांना नष्ट करून टाकावे आणि तुझ्यापासून एक महान राष्ट्र निर्माण करावे, असा प्रस्ताव परमेश्वराने मोशेला दिला. येथे परमेश्वराने मोशेची परीक्षा घेतली. त्या बंडखोर लोकांना वचनदत्त भूमीपर्यंत नेणे हे किती श्रमाचे आणि आत्म्याला छळणारे काम आहे, हे परमेश्वराला ठाऊक होते. अशा चुकणाऱ्या व कृतघ्न लोकांसाठी मोशेची चिकाटी, निष्ठा आणि प्रेम यांची तो कसोटी घेणार होता. (1SP 245)

मोशेला महान सन्मानाच्या वचनाने आजमावले गेले. परमेश्वर त्याला एका महान राष्ट्राच्या शिरोभागी बसवू इच्छित होता. जर मोशेकडे संकुचित व स्वार्थी वृत्ती असती, तर असा प्रस्ताव त्याने किती सहज व लवकर स्वीकारला असता! पण तो अशा प्राधान्याच्या वचनाकडेही लक्ष देण्यास तयार झाला नाही. (RH, 11 फेब्रुवारी, 1909)

मोशेसाठीच्या या परीक्षेत वधस्तंभाचे तत्त्व सामावलेले होते. मोशेने आपला देह ख्रिस्ताबरोबर क्रूसावर खिळवला जावा, अशी निवड केली. वधस्तंभाच्या प्रक्रियेत आपण हा महत्त्वाचा मुद्दा पाहतो:

देव आपल्या अपराधांसाठी स्वतःचा पुत्र सुपूर्द होऊ देतो. पापवाहकाच्या बाबतीत तो स्वतः न्यायाधीशाचे रूप धारण करतो, पित्याच्या आपुलकीचे गुण जणू स्वतःपासून दूर ठेवून. (FLB 104)

जर आपण जपून विचार केला तर दिसते की जिथे जिथे देवाचे न्यायदान होते, तिथे तिथे वधस्तंभ उभा राहतो. गणना 16:21 मधील हे विधान आपल्याला एक अत्यंत ठाम न्यायाधीश दाखवते. आता हे विधान काळजीपूर्वक विचारात घ्या:

वधस्तंभाचे रहस्य इतर सर्व रहस्ये स्पष्ट करते. कालवरीवरून प्रकट होणाऱ्या प्रकाशात देवाचे जे गुण आपल्याला भय आणि थरथर कापायला लावत होते, तेच आता सुंदर आणि आकर्षक दिसतात. दया, कोमलता आणि पितृस्नेह हे पवित्रता, न्याय आणि सामर्थ्य यांच्याबरोबर विलीन झालेले दिसतात. (GC 652)

इस्राएलाने मोशेला खोलवर जखम केली होती, आणि याच क्षणी मोशेमध्ये असलेल्या ख्रिस्ताच्या आत्म्याने त्या परीक्षेला प्रतिसाद दिला. मंडळीला नष्ट करण्याच्या

विधानाद्वारे नियम पापाची वाढ व्हावी म्हणून आला होता; तरीसुद्धा या क्षणी मोशेने ख्रिस्तामध्ये स्वतःला नाकारण्याचा मार्ग निवडला, आणि कृपेने त्याच्यामध्ये व अहरोनामध्ये फार मोठे कार्य केले, जे पुढीलप्रमाणे दिसले.

गणना १६:२२ तेव्हा ते पालथे पडून म्हणाले, "हे देवा, सर्व देहधारी आत्म्यांच्या देवा, एका मनुष्याने पाप केले म्हणून सर्व मंडळीवर कोपायमान होतोस काय?"

मानवी हृदयात ख्रिस्ताचा आत्मा किती मौल्यवान आहे! आपण पाहतो की मोशे आणि अहरोन यांच्या माध्यमातून ख्रिस्त पित्याजवळ मध्यस्थी करीत होता आणि हेच पित्याला हवे होते, कारण तो कोणाचाही नाश व्हावा असे इच्छित नाही, तर सर्वांनी पश्चात्तापाला यावे असेच त्याचे मन आहे. आपल्याला नक्की माहीत आहे की जरी इस्राएल नष्ट होण्यास पात्र होते, तरी आपला पिता तसे इच्छित नव्हता हे या कथेत थोड्याच वेळाने आलेल्या विधानातून स्पष्ट होते.

इब्री लोकांना पुढे नेणारा देवदूत म्हणजे येशू त्यांना नाशापासून वाचवू इच्छित होता. क्षमा त्यांच्या प्रतीक्षेत होती. देवाचे न्यायदान अगदी जवळ आले होते, आणि त्यांना पश्चात्ताप करण्यासाठी आळवित होते. स्वर्गातून आलेल्या एका विशेष व अटळ हस्तक्षेपाने त्यांच्या बंडखोरीला थांबवले. आता जर त्यांनी देवाच्या या हस्तक्षेपाला प्रतिसाद दिला असता, तर ते वाचले असते. (RH, 12 नोव्हेंबर, 1903)

मंडळीला नष्ट करण्याच्या देवाच्या न्यायदानामुळे मोशे आणि अहरोन यांच्या अंत:करणातून लोकांना वाचविण्यासाठी मध्यस्थीचा आत्मा प्रकट झाला. पित्याने हे जुना कराराच्या भाषेत सांगितले, जेणेकरून मोशे व अहरोन यांच्याकडून नवीन करारानुसार मध्यस्थी बाहेर पडावी, आणि इस्राएलला पश्चात्तापासाठी अधिक वेळ मिळावा.

गणना १६:२३-२६ मग परमेश्वर मोशेला म्हणाला, "मंडळीला सांग की, तुम्ही कोरह, दाथान व अबीराम ह्यांच्या निवासस्थानापासून निघून जा." तेव्हा मोशे उठून दाथान व अबीराम ह्यांच्याकडे गेला आणि इस्राएल लोकांचे वडील त्याच्या पाठोपाठ गेले. तो मंडळीला म्हणाला, "तुम्ही ह्या दुष्ट मनुष्यांच्या तंबूपासून निघून जा. त्यांच्या कोणत्याही वस्तूला शिवू नका; नाहीतर त्यांच्या सर्व पापांचे भागीदार होऊन तुम्ही नाश पावाल."

जेव्हा मोशे इस्राएलला येणाऱ्या नाशापासून पळ काढण्याची विनंती करीत होता, तेव्हा त्या वेळीसुद्धा जर कोरह आणि त्याच्या साथीदारांनी पश्चात्ताप करून क्षमा मागितली

असती, तर दैवी न्याय रोखला गेला असता. पण त्यांच्या हट्टी चिकाटीने त्यांच्या विनाशावर शिक्कामोर्तब केले. संपूर्ण मंडळी त्यांच्या अपराधात सहभागी झाली होती, कारण कमी-अधिक प्रमाणात सर्वांनी त्यांच्याशी सहानुभूती दाखवली होती. तरीही देवाने आपल्या महान दयेमुळे बंडाच्या नेत्यांमध्ये आणि ज्यांना त्यांनी भुलवले त्यांच्यामध्ये भेद केला. (PP 401)

## कोरह, दाथान आणि अबीराम यांचा नाश झाला

कोरह, दाथान आणि अबीराम यांनी स्वतःला सैतानाचे प्रतिनिधी बनवले होते आणि ते पूर्णपणे त्याच्या ताब्यात होते. त्यांनी पश्चात्ताप करण्यास नकार दिला. ख्रिस्ताचा आत्मा त्यांना वाचविण्यासाठी प्रयत्नशील होता, परंतु त्यांनी त्याचे ऐकले नाही. या कथेत पुढे जाताना आपण फार काळजीपूर्वक पाऊल टाकले पाहिजे, म्हणजे काहीही आपल्या लक्षातून सुटणार नाही.

गणना १६:२७-३३ मग ते कोरह, दाथान व अबीराम ह्यांच्या डेऱ्याजवळून निघून गेले; आणि दाथान व अबीराम बाहेर निघाले व आपली बायकामुले व तान्ही बाळे ह्यांच्यासह आपल्या तंबूंच्या दाराजवळ उभे राहिले. तेव्हा मोशे म्हणाला, “मी ही सर्व कामे आपल्याच मनाने केलेली नाहीत, तर ती करायला परमेश्वराने मला पाठवले आहे हे तुम्हांला दिसून येईल. इतर मनुष्यांच्या मृत्यूप्रमाणे ह्यांना मृत्यू आला किंवा इतर सर्व लोकांप्रमाणे ह्यांचे पारिपत्य झाले तर परमेश्वराने मला पाठवले नाही असे समजा. पण परमेश्वराने काही अद्भुत गोष्ट घडवली म्हणजे पृथ्वीने आपले तोंड उघडून ह्यांना व ह्यांच्या सर्वस्वाला गिळून टाकले आणि हे अधोलोकात जिवंत उतरले, तर असे समजा की, ह्या लोकांनी परमेश्वराला तुच्छ मानले आहे.” हे त्याचे सगळे शब्द बोलून संपतात न संपतात तोच त्यांच्या पायांखालची भूमी दुभंगली. आणि पृथ्वीने आपले तोड उघडून ते, त्यांची कुटुंबे, कोरहाची सगळी माणसे व त्यांची सर्व मालमत्ता गिळून टाकली. ह्याप्रमाणे ते व त्यांचे सर्वस्व अधोलोकात जिवंत उतरले. पृथ्वीने त्यांना गडप केले आणि मंडळीतून ते नष्ट झाले.

आता जर आपण केवळ शब्दाचे श्रोते असलो आणि करणारे नसलो, तर आपण हा उतारा वाचताना आरशात स्वतःच्या नैसर्गिक चेहऱ्याकडे पाहणाऱ्यासारखे होऊ आणि स्वतःलाच फसवू.

याकोब १:२२-२३ वचनाप्रमाणे आचरण करणारे असा, केवळ ऐकणारे असू नका; अशाने तुम्ही स्वतःची फसवणूक करता. कारण जर कोणी वचन नुसते ऐकून घेतो व त्याप्रमाणे आचरण करत नाही, तर तो आरशात आपले शारीरिक मुख पाहणाऱ्या माणसासारखा आहे;

पहिल्या नजरेत असे दिसते की परमेश्वराने भूमी उघडली आणि त्यांचा नाश केला. पण खरी परीक्षा येथे आहे कि आपण शास्त्राची तुलना शास्त्राशी करण्यास तयार आहोत का? येशू जो काल, आज आणि सदैव सारखाच आहे, त्याने आपल्याला सांगितले आहे:

लूक ९:५६ कारण मनुष्याचा पुत्र मनुष्यांच्या जीवाचा नाश करायला नाही, तर त्यांना तारायला आला आहे." मग ते दुसऱ्या गावाला गेले.

बलामच्या कथेचा उल्लेख करताना आपण हे तत्त्व वाचतो:

जेव्हा त्यांनी देवाच्या आज्ञांचे उल्लंघन केले, तेव्हा त्यांनी स्वतःला देवापासून वेगळे केले, आणि त्यानंतर त्यांना नाश करणाऱ्याच्या शक्तीचा अनुभव घ्यावा लागला. (GC 529)

## विध्वंसक विरुद्ध पुनर्स्थापक

कोरह, दाथान आणि अबीराम यांचा नाश कोणी केला?

कोरह, दाथान आणि अबीराम यांच्या प्रकरणातून आपल्याला एक इशारा देणारा धडा मिळतो, म्हणजे आपण त्यांच्या उदाहरणाचे अनुसरण करू नये. "ख्रिस्ताला आपणही काहींनी परीक्षेत टाकले तसे परीक्षेत टाकू नका, आणि सापांनी जसे नाश केले तसे नाश होऊ नका. तुम्ही कुरकुर करू नका, जसे काहींनी कुरकुर केली आणि नाश करणाऱ्यामुळे नाश पावले. आता या सर्व घटना त्यांना उदाहरण म्हणून घडल्या; आणि त्या लिहिल्या गेल्या आहेत आपल्या उपदेशासाठी, ज्यांच्यावर जगाचा शेवट आला आहे." (3T 353)

आपल्याला सांगितले गेले आहे की या पुरुषांचा नाश नाश करणाऱ्याने केला. मग हा नाश करणारा कोण आहे? एलन व्हाईट यांनी नमूद केलेल्या 1 करिंथकरांस 10:10 मधील "नाश करणारा" या शब्दाचा अर्थ आहे विनाशक, विशेषतः विषारी साप. आणि पुन्हा आपण लक्षात घेतो:

प्रकटीकरण ९:११ अगाधकूपाचा दूत तो त्यांच्यावर राजा आहे; त्याचे नाव इब्री भाषेत अबद्दोन आहे आणि ग्रीक भाषेत त्याचे नाव अपल्लूओन आहे.

सैतान हा नाश करणारा आहे, पण ख्रिस्त हा पुनर्स्थापक आहे. (RH, 26 नोव्हेंबर, 1895)

निर्दयपणा हा सैतानी आहे. देव प्रेम आहे; आणि त्याने निर्माण केलेले सर्व काही शुद्ध, पवित्र आणि सुंदर होते, जोपर्यंत पाप पहिल्या महान बंडखोराद्वारे आणले गेले नाही. सैतान हा माणसाला पाप करण्यास प्रवृत्त करणारा शत्रू आहे, आणि मग शक्य असल्यास त्याचा नाश करणारा आहे; आणि जेव्हा तो आपल्या बळीवर पूर्ण खात्री करतो, तेव्हा तो केलेल्या नाशात आनंद मानतो. जर त्याला परवानगी दिली गेली असती, तर त्याने संपूर्ण मानवजातीला आपल्या जाळ्यात ओढून घेतले असते. जर दैवी सामर्थ्याने हस्तक्षेप केला नसता, तर आदामचा एकही पुत्र वा कन्या सुटला नसता." (GC 534)

सैतान, हा महान शत्रू, देवाच्या पवित्र नियमाचे प्रत्येक उल्लंघन करणाऱ्याच्या मार्गावर असतो. जो आपल्या धोक्याची जाणीव ठेवत नाही आणि जो मनापासून शाश्वत आश्रय शोधत नाही, तो नाश करणाऱ्याचा भक्ष्य बनेल. (PP 517)

## देवाच्या न्यायाची प्रक्रिया

सैतानाने त्या लोकांचा नाश कसा केला, जेव्हा हे स्पष्टपणे देवाचा न्याय आहे?

मला दाखविण्यात आले की देवाचा न्याय थेट परमेश्वराकडून त्यांच्यावर आला नाही, पण पण तो अश्या रीतीने आला की: ते स्वतःला त्याच्या संरक्षणापासून बाहेर ठेवतात. तो इशारा देतो, दुरुस्ती करतो, ताडतो आणि सुरक्षिततेचा एकमेव मार्ग दाखवतो; परंतु जे लोक त्याच्या विशेष काळजीखाली असतात आणि वारंवार इशारे दिल्यानंतरही देवाच्या आत्म्यापासून स्वतंत्रपणे आपला मार्ग निवडतात, जर ते आपलीच वाट धरतात, तर मग तो आपले देवदूत सैतानाच्या ठाम हल्ल्यांना अडविण्यासाठी पाठवत नाही. समुद्रावर आणि जमिनीवर सैतानाची शक्ती कार्यरत आहे ते संकटे आणि क्लेश आणत आहे, लोकांच्या मोठ्या संख्येला नष्ट करून त्यांचा बळी खात्रीने मिळवत आहेत. समुद्रावर आणि जमिनीवर वादळे व तुफान उठतील, कारण सैतान मोठ्या क्रोधाने खाली उतरला आहे. तो कार्यरत आहे. त्याला माहीत आहे की त्याचा वेळ

थोडकाच आहे; आणि जर त्याला रोखले गेले नाही, तर आपण त्याच्या शक्तीची अशी भयानक प्रगटीकरणे पाहू, ज्याची आपण कधी कल्पनाही केली नसेल. (14MR 3)

देव राष्ट्रांबरोबर हिशोब ठेवतो. एकही चिमणी जमिनीवर पडत नाही, जोवर त्याला त्याची खबर नसते. जे लोक आपल्या सहकाऱ्यांशी वाईट वर्तन करतात आणि म्हणतात, “देवाला काय कळते?” त्यांना एक दिवस खूप काळ थांबलेला सूड अनुभवावा लागेल. या काळात देवाविषयी असामान्य तुच्छता दाखविली जाते. माणसे उद्धटपणा आणि अवज्ञेत इतक्या टप्प्यावर पोहोचली आहेत की त्यांच्या पापाचा प्याला जवळजवळ भरून वाहू लागला आहे. अनेक जण दयेच्या मर्यादेच्या सीमेपासून पुढे गेले आहेत. लवकरच देव दाखवील की तो खरोखरच जिवंत देव आहे. तो देवदूतांना म्हणेल, “आता सैतानाच्या नाश करण्याच्या प्रयत्नांना अडथळा आणू नका. त्याला अवज्ञेच्या मुलांवर आपली दुष्टता प्रकट करू द्या; कारण त्यांच्या पापाचा प्याला भरून वाहिला आहे. त्यांनी एका पातळीवरील दुष्टतेपासून दुसऱ्या पातळीपर्यंत प्रगती केली आहे, आणि रोज त्यांच्या बेकायदेशीरतेत वाढ केली आहे. आता मी नाश करणाऱ्याला त्याचे काम करण्यापासून थांबवण्यासाठी हस्तक्षेप करणार नाही.” (RH, 17 सप्टेंबर, 1901)

## हात पुढे करणे

देवाचा न्याय कसा उलगडतो? देव सूड कसा घेतो? जे लोक पश्चात्ताप करण्यास नकार देतात आणि त्याच्या आज्ञांमध्ये चालत नाहीत, त्यांचे रक्षण करण्यासाठी तो आपल्या देवदूतांना आदेश देत नाही. विचार करण्यासाठी आणखी एक पुरावा येथे आहे.

इस्राएलमधील या पुरुषांनी कुरकुर केली आणि लोकांना बंडात त्यांच्या सोबत उभे राहण्यास प्रवृत्त केले; आणि देवाने आपला हात पुढे करून अपराध्यांना गिळून टाकल्यानंतरसुद्धा, आणि लोक भयाने आपल्या तंबूंमध्ये पळाले तरीही, त्यांचे बंड थांबले नाही. (पत्र 12a, 1893; 1BC 1114)

वचनातील याच भाषेकडे लक्ष द्या:

निर्गम ३:२० मग मी आपला हात पुढे करून मिसर देशात ज्या सर्व अद्भुत कृती करणार त्यांचा मारा मी त्याच्यावर करीन; मग तो तुम्हांला जाऊ देईल;

देवाने मिसरमध्ये आपला हात कसा पुढे केला?

स्तोत्रसंहिता ७८:४८-४९ त्याने त्यांची गुरेढोरे गारांच्या, व जनावरे विजांच्या हवाली केली. त्याने त्यांच्यावर आपला कोपाग्नी, क्रोध, रोष व संकट ह्या अनिष्टकारक दूतांची स्वारी सोडली.

मिसरमधील पीडांच्या सविस्तर स्पष्टीकरणासाठी मिसरामधील कालवरी ही पुस्तिका पहा. ईयोबाच्या पुस्तकात हात पुढे करण्याकडे पुन्हा लक्ष द्या.

ईयोब १:११-१२ तू आपला हात पुढे करून त्याच्या सर्वस्वास लावून तर पाहा, म्हणजे तो तुझ्या तोंडावर तुझा अव्हेर करील." परमेश्वर सैतानाला म्हणाला, "पाहा, त्याचे सर्वस्व तुझ्या हाती देतो; त्याला मात्र हात लावू नकोस." मग सैतान परमेश्वरासमोरून निघून गेला.

ईयोब १:१६ तो हे सांगत आहे इतक्यात दुसऱ्या एकाने येऊन सांगितले, "दैवी अग्नीचा आकाशातून वर्षाव झाला; त्याने मेंढरे व गडी जाळून भस्म केले; हे तुला सांगायला मी एकटा निभावून आलो आहे."

## देवाचा चेहरा लपवणे

आपण पाहतो की "तुझा हात पुढे कर" किंवा "तुझा हात पसरव" या वाक्याखाली सैतानाला हे कृत्य करण्याची परवानगी मिळाली. आपल्याला सांगितले गेले आहे की देवाचा न्याय थेट परमेश्वराकडून येत नाही; पण शेवटी देव दुष्टांना त्यांच्या निवडीवर सोडून देतो ज्या स्वामीची त्यांनी निवड केली आहे, त्याची सेवा करण्यासाठी. दु:खाने आपला स्वर्गीय पिता आपला चेहरा लपवतो.

अनुवाद ३१:१७-१८ त्या समयी त्यांच्यावर माझा कोप भडकेल, मी त्यांचा त्याग करीन आणि त्यांच्यापासून आपले मुख लपवीन; त्यांचा फडशा उडेल व त्यांच्यावर पुष्कळ विपत्ती व संकटे ओढवतील. मग ते म्हणतील, 'आपला देव आपल्यामध्ये नाही म्हणूनच ह्या विपत्ती आपल्यावर ओढवल्या आहेत ना?' त्या वेळेस ते अन्य देवांकडे वळल्याने त्यांच्या हातून जी दुष्टाई घडेल तिच्यामुळे मी आपले मुख त्यांच्यापासून खरोखरच लपवीन.

हेच तत्त्व आपण यरुशलेमच्या विध्वंसात पाहतो.

यहूद्यांनी स्वतःसाठी बेड्या घडवल्या; त्यांनी स्वतःसाठी सूडाचा प्याला भरला. राष्ट्र म्हणून त्यांच्या पूर्ण नाशात, आणि त्यांच्या विखुरण्यानंतर त्यांना जी सर्व संकटे भोगावी लागली, ती फक्त त्यांच्या स्वतःच्या हातांनी पेरलेल्या पिकाची कापणी होती. संदेष्टा म्हणतो: "हे इस्राएला, तू स्वतःचा नाश केला आहेस;" "कारण तू आपल्या अधर्मामुळे कोसळला आहेस." (होशे 13:9; 14:1) त्यांच्या दु:खांचे वर्णन अनेकदा देवाच्या थेट आदेशाने त्यांच्यावर ओढविलेल्या शिक्षेसारखे केले जाते. याच प्रकारे तो महान फसवणारा स्वतःचे काम लपवतो. दैवी प्रेम आणि दयेला हट्टी नकार देऊन यहूद्यांनी देवाचे संरक्षण स्वतःवरून दूर केले, आणि सैतानाला त्याच्या इच्छेनुसार त्यांच्यावर राज्य करण्याची परवानगी मिळाली. यरुशलेमच्या विध्वंसात झालेल्या भयानक क्रूरता या त्या लोकांवर सैतानाच्या सूडबुद्धीच्या शक्तीचे प्रात्यक्षिक होते, ज्यांनी स्वतःला त्याच्या ताब्यात दिले होते. (GC 35,36)

## जर बद्दलचा प्रश्न

तथापि, या वचनांना समजून घेण्यात एक आव्हान आहे:

गणना १६: २८-३० नंतर मोशे म्हणाला, "परमेश्वराने मला मी तुम्हास सांगितलेल्या गोष्टी करायला पाठवले आहे या बद्दलचा पुरावा मी तुम्हास दाखवीन. या गोष्टी करण्याची कल्पना माझी नव्हती हेही मी तुम्हास दाखवीन. हे इथले लोक मरतील. पण ते जर सामान्य रीतीने मरण पावले जशी माणसे नेहमी मरतात, तर त्यावरून असे दिसेल की परमेश्वराने मला खरेच पाठवले नाही. पण जर परमेश्वराने या लोकांस वेगळ्या नव्या रीतीने मारले. तर तुम्हास कळेल की त्यांनी परमेश्वराविरूद्ध पाप केले होते. हा पुरावा आहे. धरती दुभागेल आणि त्या लोकांस आपल्या पोटात घेईल. ते जिवंतपणीच त्यांच्या कबरेत जातील. आणि त्यांची सर्व चीजवस्तू त्यांच्याबरोबर जाईल."

पहिल्या दृष्टीक्षेपात ही वचने अगदी स्पष्टपणे दाखवितात की हा नाश खरोखरच देवाच्या थेट आज्ञेमुळे झाला. पण याचे उत्तर त्या लहानशा "जर" या शब्दात दडलेले आहे.

गणना १६: २९-३० हे इथले लोक मरतील. पण ते जर सामान्य रीतीने मरण पावले जशी माणसे नेहमी मरतात, तर त्यावरून असे दिसेल की परमेश्वराने मला खरेच पाठवले नाही. पण जर परमेश्वराने या लोकांस वेगळ्या नव्या रीतीने मारले. तर तुम्हास कळेल की त्यांनी परमेश्वराविरूद्ध पाप केले होते. हा पुरावा आहे. धरती दुभागेल आणि त्या

लोकांस आपल्या पोटात घेईल. ते जिवंतपणीच त्यांच्या कबरेत जातील. आणि त्यांची सर्व चीजवस्तू त्यांच्याबरोबर जाईल."

मिसरमध्ये, लाल समुद्रात आणि सिनाई पर्वतावर घडलेल्या सर्व घटनांमध्ये परमेश्वर मोशेला कसा पुढे नेत होता याचे लोकांना पुरेपूर पुरावे मिळाले होते. मोशेला परमेश्वराने पाठविले आहे याची विपुल साक्ष उपलब्ध होती. मोशेने ज्या संदर्भात एखादा चमत्कार केला, तो प्रत्यक्षात शंकेला उत्तर देणारा चमत्कार ठरला. जेव्हा सैतानाने येशूला देवाचा पुत्र म्हणून त्याच्या स्थानाबद्दल प्रश्न विचारला, तेव्हा त्याने "जर तू … आहेस" या शब्दांशी संबंधित प्रलोभनाला उत्तर म्हणून चमत्कार करण्यास नकार दिला.

मत्तय ४:३-४ तेव्हा परीक्षक त्याच्याजवळ येऊन म्हणाला, "तू देवाचा पुत्र आहेस तर ह्या धोंड्यांच्या भाकरी व्हाव्यात अशी आज्ञा कर." परंतु त्याने उत्तर दिले की, "'मनुष्य केवळ भाकरीने नव्हे, तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या वचनाने जगेल,' असा शास्त्रलेख आहे."

जेव्हा "जर" असे प्रश्न एखाद्याच्या ओळखीचे किंवा सेवकाईचे समर्थन करण्यासाठी चमत्कार करण्याशी जोडले जातात, तेव्हा आपण हे ओळखतो की ते सैतानाचे प्रलोभन आहे. एलियालाही आपल्या सेवकाईत मोशे आणि येशूप्रमाणेच असेच प्रलोभन आले होते. त्याला राजाला त्याच्या चुकीच्या कृतींबद्दल इशारा देण्यासाठी पाठविण्यात आले होते. पण राजाने त्याला पकडण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे हे स्पष्ट झाले की त्याला एलियावर विश्वास नव्हता.

२ राजे १:१० एलीयाने त्या पन्नासांच्या नायकाला म्हटले, "मी देवाचा माणूस असलो तर आकाशातून अग्नीचा वर्षाव होऊन तो तुला व तुझ्या पन्नास शिपायांना भस्म करो." तेव्हा आकाशातून अग्नीचा वर्षाव होऊन त्याने त्याला व त्याच्या पन्नास शिपायांना भस्म केले.

कार्मेल पर्वतावर हे ठामपणे सिद्ध झाले होते की एलिया देवाचा माणूस आहे. इतक्या लोकांचा विरोध असूनही, काही वेळा एलिया आपल्या बोलावणीबद्दल शंका घेण्याच्या प्रलोभनात पडला.

१ राजे १९:९-१० तो तेथे जाऊन एका गुहेत राहिला; तेव्हा पाहा, परमेश्वराचे वचन त्याला प्राप्त झाले. तो त्याला म्हणाला, "एलीया, तू येथे काय करीत आहेस?" तो म्हणाला, "सेनाधीश देव परमेश्वर ह्याच्याविषयी मी फार ईर्ष्यायुक्त झालो आहे;

कारण इस्राएल लोकांनी तुझा करार पाळण्याचे सोडले, तुझ्या वेद्या मोडून टाकल्या, तुझे संदेष्टे तलवारीने वधले; मीच काय तो एकटा उरलो आहे; आणि आता ते माझाही जीव घेऊ पाहत आहेत.”

सैतानाने एलियाला आपल्या बोलावणीवर शंका घ्यायला प्रवृत्त केले, आणि हे “जर” या शब्दात उघड झाले आहे. हा छोटासा शब्द सैतानाच्या प्रलोभनाचा भांडाफोड करतो. मागितलेला चमत्कार हा एलियाच्या स्वतःच्या ओळखीशी संबंधित संघर्षाशी मिसळलेला होता कि तो खरोखर देवाचा माणूस आहे की नाही. तो संघर्ष का करीत होता? कारण त्याला माहीत होते की इझेबेलपासून तो पळून गेला तेव्हा तो अपयशी ठरला होता. त्याला आपली ओळख सिद्ध करण्यासाठी चमत्कार घडवून आणण्याचा मोह झाला. पण आपण जाणतो की हा योग्य आत्मा नव्हता, कारण येशू आपल्याला हे सांगतो.

लूक ९:५४-५६ तेव्हा त्याचे शिष्य याकोब व योहान हे पाहून म्हणाले, “हे प्रभू, एलीयाने केले होते तसेच आकाशांतून अग्नीने पडून त्याचा नाश करावा म्हणून आम्ही आज्ञा करावी, अशी तुझी इच्छा आहे काय?” परंतु त्याने वळून त्यांना धमकावले आणि म्हटले, “तुम्ही कोणत्या आत्म्याचे आहात हे तुम्हास ठाऊक नाही; कारण मनुष्याचा पुत्र मनुष्यांच्या जीवाचा नाश करायला नाही, तर त्यांना तारायला आला आहे.” मग ते दुसऱ्या गावाला गेले.

मोशे कोरह, दाथान आणि अबीराम यांच्या खोट्या आरोपांनी खोलवर जखमी झाला होता. त्याने पाहिले की जवळजवळ संपूर्ण मंडळी त्याच्या विरोधात गेली आहे. त्याने जे काही केले होते, त्या सगळ्यानंतर त्यांनी त्याला सोडून दिले आणि पळून गेले (मार्क १४:५०). आपल्या देहात तो दु:ख भोगत असताना, सैतानाने त्याला या वधस्तंभावरून खाली उतरण्याचे आवाहन केले. आपल्या स्थानाला टिकवून ठेवण्यासाठी एखादा चमत्कार करावा, असे त्याला प्रलोभन दिले गेले. ख्रिस्ताने कधीही “जर” या प्रश्नाला प्रतिसाद दिला नाही. कधीही स्वतःची ओळख सिद्ध करण्यासाठी चमत्काराचा आधार घेतला नाही. त्याने नेहमी आपल्या पित्याने सांगितलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवला.

भविष्यवक्त्यांतील सर्वांत महानाला देखील तुरुंगात असताना याच परीक्षेतून जावे लागले. “जर” हा शब्द योहानाच्या शिष्यांच्या तोंडून प्रकट झाला.

मत्तय ११:२-३योहान बंदिशाळेत असताना त्याने ख्रिस्ताच्या कृत्यांविषयी ऐकून आपल्या शिष्यांना पाठवून त्याला विचारले, “जे येणार आहेत ते आपणच, की आम्ही दुसऱ्याची वाट पाहावी?”

योहानाचे जीवन हे सततचे परिश्रम आणि कार्यात्मक आयुष्य होते; पण तुरुंगातील अंधार आणि निष्क्रियतेने त्याच्या आत्म्यावर फार जड ओझे ठेवले. आठवड्याच्या मागोमाग आठवडे जात होते, काहीही बदल होत नव्हता. त्यामुळे निराशा आणि शंकेने हळूहळू त्याच्या मनावर कब्जा करायला सुरुवात केली. त्याचे शिष्य मात्र त्याला सोडून गेले नाहीत. त्यांना तुरुंगात जाण्याची परवानगी होती आणि ते त्याला येशूच्या कार्यांची बातमी सांगत. लोक कसे त्याच्याकडे समूहाने जमत आहेत, हे ते त्याला सांगत. पण त्यांनी असा प्रश्न केला की जर हा नवा शिक्षक खरोखर मसीहा असेल, तर त्याने योहानाची सुटका का केली नाही? त्याने आपल्या विश्वासू दूताला स्वातंत्र्यापासून किंबहुना जीवनापासूनही वंचित का राहू दिले?

हे प्रश्न निष्फळ नव्हते. ज्या शंका कधीही उत्पन्न झाल्या नसत्या, त्या या शंकांच्या रूपाने योहानाच्या मनात शिरल्या. या शिष्यांच्या शब्दांनी प्रभूच्या दूताच्या आत्म्याला जखम पोहोचली, हे पाहून सैतान आनंदला. अरे, कितीदा असे घडते की जे स्वतःला एखाद्या चांगल्या माणसाचे मित्र समजतात, आणि जे त्याच्याशी निष्ठा दाखवण्यासाठी उत्सुक असतात, तेच त्याचे सर्वांत धोकादायक शत्रू ठरतात! कितीदा असे घडते की त्याच्या विश्वासाला बळ देण्याऐवजी, त्यांच्या शब्दांनी त्याला खचवले आणि निराश केले! (DA 214, 215)

योहानासाठी मात्र मोशे आणि एलियाच्या प्रमाणे कोणताही चमत्कार घडला नाही. तो मृत्यूकडे गेला, परंतु पूर्ण विश्वासाने की ख्रिस्तच खरोखर मसीहा आहे. योहानाचे शिष्य जेव्हा येशूसोबतच्या त्यांच्या भेटीतून परतले, तेव्हा योहानाला त्याला हवी असलेली वार्ता मिळाली.

शिष्यांनी तो संदेश योहानापर्यंत आणला, आणि तो त्याच्यासाठी पुरेसा ठरला. योहानाला मसीहाविषयीची ही भविष्यवाणी आठवली "प्रभू परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आला आहे; कारण दीनांना शुभवृत्त सांगण्यास परमेश्वराने मला अभिषेक केला आहे; भग्नहृदयी जनांना पट्टी बांधावी, धरून नेलेल्यांना मुक्तता व बंदिवानांना बंधमोचन विदित करावे; परमेश्वराच्या प्रसादाचे वर्ष व आमच्या देवाचा सूड घेण्याचा दिवस विदित करावा; सर्व शोकग्रस्तांचे सांत्वन करावे; (यशया ६१:१, २) ख्रिस्ताची कार्ये केवळ हे सिद्ध करत नव्हती की तोच मसीहा आहे, तर त्याचे राज्य कोणत्या रीतीने उभारले जाणार आहे हे देखील दाखवून देत होते. योहानासमोर तीच सत्यता प्रकट झाली जी वाळवंटात एलियासमोर प्रकट झाली होती, जेव्हा परमेश्वर जवळून जात असताना त्याच्यासमोरून मोठा सुसाट्याचा वारा सुटून डोंगर विदारत व खडक फोडत होता; पण त्या वाऱ्यात परमेश्वर नव्हता. वारा सुटल्यानंतर भूमिकंप झाला;

पण त्या भूमिकंपातही परमेश्वर नव्हता. भूमिकंपानंतर अग्नी प्रकट झाला; पण त्या अग्नीतही परमेश्वर नव्हता; त्या अग्नीनंतर शांत, मंद वाणी झाली. (१ राजे १९:११, १२) येशूचे कार्य देखील असेच असणार होते. शस्त्रांचा आवाज, सिंहासनांची उलथापालथ, राजसत्तांचा विनाश यांद्वारे नव्हे; तर दयेचे आणि आत्मत्यागाचे जीवन जगून, माणसांच्या अंत:करणाशी बोलून. (DA 217)

जेव्हा परमेश्वराने स्वर्गातून अग्नी खाली पाठवली हे दाखवण्यासाठी की एलिया खऱ्या देवाची उपासना करतो, त्यानंतर एलियाने परमेश्वराच्या पुढे धाव घेतली आणि स्वतःच्या हाताने बालाच्या संदेष्ट्यांना तलवारीने ठार केले.

परमेश्वराकडून स्पष्ट असा आदेश मिळाल्याशिवाय त्याने स्वतःहून ती जबाबदारी स्वीकारली जी त्याला देण्यात आली नव्हती. त्याने जी पावले उचलली त्यासाठी प्रभुचे कोणतेही विशेष वचन त्याच्याकडे नव्हते, आणि त्याच्या कृतींमध्ये ठोस उद्देशही नव्हता. शंका आणि अनिश्चिततेने तो व्याकुळ झाला होता. आपल्या प्राणाची रक्षा करण्यासाठी तो कधी इकडे तर कधी तिकडे धावत सुटला. तरीदेखील देव एलियाला विसरला नाही. त्याने आपल्या सेवकासाठी कार्य केले आणि त्याला विचारले “एलिया, तू येथे काय करीत आहेस?”

ही घटना जर नीट काळजीपूर्वक व प्रार्थनेने अभ्यासली, तर देवाच्या लोकांसाठी त्यांच्या अडचणींमध्ये ती मोठी मदत ठरेल. माणसाने याची खबरदारी घ्यावी की देवाने जी जबाबदारी त्याच्यावर सोपवलेली नाही, ती त्यांनी स्वतःहून आपल्या अंगावर घेऊ नये; तसेच प्रभु आणि परीक्षेत, प्रलोभनांतून जाणाऱ्या त्याच्या लोकांच्या मध्ये स्वतःला आडवे आणू नये कारण असे झाले तर त्या लोकांच्या अनुभवांतून देवाची उद्दिष्टे पूर्ण होणार नाहीत. (1888, पृ. 489)

जेव्हा प्रभुने मोशेला सांगितले की, “कोरह, दातान आणि अबीराम यांच्या तंबूपासून लोकांना दूर उभे राहण्यास सांग,” तेव्हा मोशेने लोकांसमोर जे “जर असे झाले तर...” असे प्रश्न उपस्थित केले, त्यामध्ये त्याने आपल्या वाट्याला न दिलेल्या जबाबदाऱ्या स्वतःवर घेतल्या काय? आपण पाहतो की एलियाने अशाच “जर...” प्रश्नांना कसा प्रतिसाद दिला त्याने स्वर्गातून अग्नी खाली येण्याची आज्ञा केली आणि त्याला पकडण्यासाठी आलेल्या लोकांचा नाश केला. पण आपण हेही जाणतो की येशूने स्पष्ट केले आहे की त्या अग्नीत देवाचा आत्मा नव्हता. तसेच, सिनाई पर्वतावर देवाने एलियाला दाखवून दिले होते की तो अग्नीत नाही.

कोरह, दातान आणि अबीराम यांच्यावरून जेव्हा देवाने आपल्या दूतांची संरक्षणाची

भिंत मागे घेतली, तेव्हा सैतानाने मोशेला “जर...” प्रश्नांनी फसवण्याचा प्रयत्न केला कोरह, दातान आणि अबीराम यांचा नाश तो कसा करणार आहे, याबाबत. लक्षात ठेवा, सैतानाने या माणसांवर पूर्ण ताबा मिळवला होता. त्याने या लोकांना पश्चात्ताप करण्यासाठी येशूच्या आत्म्याने केलेल्या करुणावाणीला कठोरपणे विरोध करायला प्रवृत्त केले. येशू हा पुनर्स्थापित करणारा आहे, तर सैतान हा विध्वंसक आहे. आणि मोशेच्या मनात शंका निर्माण करून सैतानाने आपले विध्वंसाचे कार्य देवाचा थेट न्याय असल्याप्रमाणे भासवले. ही इतकी चलाख फसवणूक आहे की शक्य असल्यास निवडलेल्यांनाही ती फसवेल.

## विरुद्ध तत्वांची समस्या

जर आपण हे मानण्याचा निर्णय घेतला की देवपुत्राने स्वतः पृथ्वी उघडली आणि त्या माणसांचा नाश केला, तर मग आपण हेही मान्य करावे की त्या माणसांना पश्चात्ताप करावा म्हणून तो जे आवाहन करीत होता, त्याला मृत्यूच्या धमकीने पाठबळ दिले गेले होते. ही दोन परस्परविरोधी तत्त्वे आहेत. एकीकडे वाचविण्याचा प्रयत्न करणे आणि दुसरीकडे लगेचच नष्ट करणे, असे कधीच होऊ शकत नाही. जर पश्चात्तापाच्या आवाहनाला मारण्याच्या धमकीची जोड दिली गेली असेल, तर मग ते आवाहन म्हणजे विवेकबुद्धीवर जबरदस्ती लादणे ठरते.

जगातील अंधकारमय सावल्या दूर व्हाव्यात आणि माणसाने पुन्हा देवाकडे वळावे म्हणून सैतानाची फसवी सत्ता मोडून काढली जाणे आवश्यक होते. हे बलपूर्वक कधीच साध्य होऊ शकत नव्हते. बलाचा वापर हा देवाच्या राज्याच्या तत्त्वांच्या विरोधात आहे. देवाला केवळ प्रेमाची सेवा हवी आहे; आणि प्रेम आज्ञेने निर्माण होत नाही, ते जबरदस्तीने किंवा अधिकाराने जिंकता येत नाही. फक्त प्रेमानेच प्रेम जागृत होते. देवाला जाणणे म्हणजे त्याच्यावर प्रेम करणे होय; आणि देवाचा स्वभाव हा सैतानाच्या स्वभावाच्या पूर्ण विरोधात प्रकट झाला पाहिजे. DA 22

जर देव सैतानासारख्या पद्धती वापरत असेल, तर देवाचा स्वभाव सैतानाच्या स्वभावाच्या विरोधात उभा राहू शकत नाही. “मनुष्यपुत्र नाश करण्यासाठी आला नाही, तर वाचविण्यासाठी आला आहे” हे विधान एक सार्वत्रिक तत्त्व म्हणून येथे उघड होते.

अहो, किती दिव्य उदारता! हे जग पूर्णपणे नष्ट करून टाकणे किती सोपे होते, पण त्याची सुधारणा करणे किती कठीण! तरीसुद्धा ख्रिस्त असे घोषित करतो: “मनुष्यपुत्र

लोकांचा नाश करायला आलेला नाही, तर त्यांना वाचवायला आलेला आहे." देवपुत्राने या जगाची निराशाजनक अवस्था जाणली, आणि स्वतः या जगात आला, जेणेकरून त्याच्यामार्फत मनुष्याला अनंत जीवन मिळू शकेल. RH, 11 डिसेंबर, 1888

जेव्हा आपण हे समजतो की "कोकरू जगाच्या स्थापनेपासून बळी केला गेला आहे" आणि वधस्तंभाचे तत्त्व गेले सहा हजार वर्षे सर्वकाळ कार्यरत आहे, तेव्हा आपल्याला हे दिसते की ख्रिस्ताचे पृथ्वीवरील कार्य हे प्रत्यक्षात त्याच्या संपूर्ण इतिहासभर जगासाठी असलेल्या कार्याचे प्रकटीकरण आहे. हे तत्त्व समजणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून आपण हे जाणू शकू की येशू ख्रिस्त काल, आज आणि सदैव सारखाच आहे. आपण हे सार्वत्रिक तत्त्व नेहमी स्मरणात ठेवले पाहिजे:

सैतान हा विध्वंसक आहे, पण ख्रिस्त हा पुनर्स्थापक आहे. (RH, 26 नोव्हेंबर, 1895)

ही दोन्ही तत्त्वे एकमेकांच्या पूर्ण विरुद्ध आहेत. ती प्रकाश आणि अंधकारासारखी आहेत, आणि ही दोन तत्त्वे कधीच मिसळू शकत नाहीत. जेव्हा सैतानाने "सर्वश्रेष्ठासारखे व्हावे" अशी इच्छा धरली, तेव्हा त्याचा हेतू असा होता की त्याची स्वतःची ओळख पित्याच्या ओळखीत मिसळली जावी, जेणेकरून त्याचे गुणधर्म पित्यावर चढवले जातील आणि तो स्वतः पित्याच्या तेजात लपून बसेल.

सुरुवातीपासूनच सैतानाची आखलेली योजना ही होती की लोक देवाला विसरून जावेत, जेणेकरून तो त्यांना स्वतःच्या ताब्यात आणू शकेल. म्हणून त्याने देवाच्या स्वभावाचे चुकीचे चित्र लोकांसमोर मांडले, जेणेकरून माणसांच्या मनात त्याच्याविषयी खोटी समजूत निर्माण व्हावी. सृष्टीकर्त्याला लोकांच्या मनात अशा स्वरूपात दाखवले गेले की जणू तो दुष्ट राजकुमाराच्या गुणांनी झाकलेला आहे मनमानी करणारा, कठोर, क्षमा न करणारा आहे जेणेकरून माणसे त्याला घाबरावीत, त्याला टाळतील आणि अगदी त्याचा द्वेष करतील. सैतानाची आशा होती की ज्यांना त्याने फसवले त्यांच्या मनांत असा गोंधळ निर्माण व्हावा की त्यांनी देवाला आपल्या विचारातून काढून टाकावे. मग तो माणसातील दैवी प्रतिमा नाहीशी करून त्याच्या जागी स्वतःची प्रतिमा त्यांच्या आत्म्यावर उमटवेल; तो आपल्या आत्म्याने लोकांना भरेल आणि त्यांना आपल्या इच्छेप्रमाणे कैद करून ठेवेल.

देवाच्या स्वभावाचा विपर्यास करून आणि त्याच्याविषयी अविश्वास उत्पन्न करूनच सैतानाने हवेला पाप करण्यासाठी प्रवृत्त केले. पापामुळे आपल्या पहिल्या पालकांचे मन अंधारमय झाले, त्यांचे स्वरूप खालावले, आणि त्यांच्या स्वतःच्या संकुचितपणा व स्वार्थामुळे देवाविषयीची त्यांची समज विकृत झाली. आणि जसजसे माणसे पापात

अधिक धाडसी होत गेली, तसतसे देवाचे ज्ञान आणि त्याच्यावरील प्रेम त्यांच्या मनातून व अंत:करणातून नष्ट होत गेले. 5T 738

प्रभुने कोरह, दातान आणि अबीराम यांना सर्वप्रथम विध्वंसकाच्या हाती जाऊ दिले, कारण आपण लक्षात ठेवतो की प्रेरणेत आपल्याला असे सांगितले आले आहे की:

कोरह, दातान आणि अबीराम यांच्या बाबतीत आपल्याला एक चेतावणीचा धडा मिळतो, की आपण त्यांच्या उदाहरणाचा मागोवा घेऊ नये. “आमच्या काहींप्रमाणे तुम्हीही ख्रिस्ताची परीक्षा घेऊ नका, आणि ते जसे सर्पांमुळे नष्ट झाले तसे तुम्हीही नष्ट व्हाल. तसेच, आमच्या काहींप्रमाणे तुम्ही कुजबुज करू नका, आणि ते जसे विध्वंसकाने नष्ट केले तसे तुम्हीही नष्ट व्हाल.” 3T 353

## देवाची अग्नी

यामुळे इतरांना हे जाणून घेण्यासाठी वेळ मिळाला की ते अत्यंत धोक्यात आहेत आणि त्यांनी विध्वंसकापासून वाचण्यासाठी आपल्या तारणहाराकडे धाव घ्यायला हवी. पण दुर्दैवाने त्यांनी पश्चात्ताप केला नाही आणि ते पूर्णपणे शैतानाच्या हवाली झाले.

गणना 16:35 मग परमेश्वरापासून अग्नी निघाला व त्याने त्या धूप जाळणाऱ्या दोनशे पन्नास पुरुषांना भस्म केले.

मात्र न्याय तिथेच संपला नाही. ढगातून बाहेर पडलेल्या अग्नीने धूप अर्पण करणारे दोनशे पन्नास सरदार भस्मसात केले. हे पुरुष बंडामध्ये अग्रेसर नव्हते, म्हणून त्यांचा नाश मुख्य कटकारस्थानकर्त्यांसोबत झाला नाही. त्यांना स्वतःचा शेवट पाहण्याची आणि पश्चात्ताप करण्याची संधी देण्यात आली होती; परंतु त्यांची सहानुभूती बंडखोरांसोबत होती, म्हणून त्यांनी त्यांच्याच परिणामात भाग घेतला. PP 401

अनेकजण म्हणतील, “पण येथे तर लिहिले आहे की परमेश्वराचा अग्नी आला,” आणि ते या आज्ञेकडे दुर्लक्ष करतील की सर्व शास्त्रवचनांची तुलना करावी आणि हे दाखवावे की येशू ख्रिस्त काल, आज आणि सदैव सारखाच आहे.

येशूने शिष्यांना स्पष्ट सांगितले होते की एलियाच्या प्रार्थनेला उत्तर म्हणून स्वर्गातून आलेली अग्नी हा देव ज्या आत्म्याने कार्य करतो त्या आत्म्यापासून नव्हती. आपण ईयोबाच्या कथेतून जाणतो की “देवाची अग्नी” खाली उतरली आणि ईयोबाच्या मेंढ्या

व त्याचे सेवक भस्मसात झाले.

ईयोब १:१६ तो हे सांगत आहे इतक्यात दुसऱ्या एकाने येऊन सांगितले, “दैवी अग्नीचा आकाशातून वर्षाव झाला; त्याने मेंढरे व गडी जाळून भस्म केले; हे तुला सांगायला मी एकटा निभावून आलो आहे.”

आपल्याला माहीत आहे की ही प्रत्यक्ष अग्नी सैतानाने खाली उतरवली आणि त्याने त्यांना भस्मसात केले. त्यामुळे जर या मजकुरात प्रत्यक्ष अग्नीचा उल्लेख असेल, तर तो याच रीतीने आला. तरीदेखील, 'नाश करणारे देवदूत' या पुस्तिकेत जसे स्पष्ट केले आहे, हा अग्नी देवाच्या आत्म्याच्या ठपक्यामुळे निर्माण झालेला असू शकतो, ज्याने त्या माणसांच्या अंतःकरणात भय निर्माण केले आणि एका चमकत्या प्रकाशासारखा प्रकट झाला. आत्मा त्यांच्या पापांना उघड करत होता आणि त्यांना पश्चात्ताप करण्यास प्रवृत्त करत होता; परंतु ते दयाळू देवावर विश्वास ठेवू शकले नाहीत, त्यामुळे त्यांच्या पापांनीच त्यांना भस्म केले. स्वर्गातून येणाऱ्या अग्नीचे हे तत्त्व अनेक उताऱ्यांमध्ये नमूद केले आहे.

यशया ३०: २७-२८,३० पाहा, परमेश्वराचे नाम दुरून येत आहे, त्याचा क्रोध भडकला आहे, धुराचा लोट चढत आहे; त्याचे ओठ क्रोधाने स्फुरत आहेत, त्याची जिव्हा भस्म करणाऱ्या अग्नीसारखी आहे; त्याचा श्वास दुथडी भरून वाहणाऱ्या व गळ्यापर्यंत पोहचणाऱ्या प्रवाहासारखा आहे, तो राष्ट्रांना नाशरूप चाळणीने चाळतो; भ्रांतिमूलक लगाम लोकांच्या जाभाडात आला आहे. तेव्हा परमेश्वर आपला प्रतापी शब्द कानी पाडील, आणि आपल्या क्रोधाचे फुरफुरणे, भस्म करणाऱ्या अग्नीची ज्वाला, मेघांचा गडगडाट आणि पर्जन्य व गारा ह्यांची वृष्टी ह्यांनी आपले भुजबल दाखवील.

आपण पाहतो की ख्रिस्ताच्या वधस्तंभावर अग्नी आणि गारपीट प्रकट झाली होती. स्तोत्र 18 हेच ख्रिस्ताच्या वधस्तंभाचे प्रकटीकरण करते.

स्तोत्रसंहिता १८: ४-६,८,१२ मृत्यूच्या बंधनांनी मला वेष्टिले, नाशाच्या पुरांनी मला घाबरे केले. अधोलोकाच्या बंधनांनी मला घेरले, मृत्यूचे पाश माझ्यावर आले. मी आपल्या संकटात परमेश्वराचा धावा केला, माझ्या देवाला मी हाक मारली; त्याने आपल्या मंदिरातून माझी वाणी ऐकली, माझी हाक त्याच्या कानी गेली. त्याच्या नाकपुड्यांतून धूर निघत होता, त्याच्या मुखातून ग्रासणारा अग्नी निघत होता, त्यामुळे निखारे धगधगत होते. त्याच्यापुढील तेजाने घनमेघांमधून गारा व धगधगीत इंगळ बाहेर पडले.

अनुवाद ३३:२ तो म्हणाला, “परमेश्वर सीनायहून आला, सेईरावरून आमच्यावर1 उदय पावला; पारान पर्वतावरून तो प्रकटला, लक्षावधी पवित्रांच्या मधून तो आला, त्याच्या उजव्या हातापासून अग्निज्वाला निघाली.

यिर्मया ५:१४ ह्यामुळे परमेश्वर, सेनाधीश देव म्हणतो, “तुम्ही असे बोलता म्हणून पाहा, मी आपले शब्द तुझ्या मुखात अग्नी असे आणि हे लोक सरपण असे करीन आणि तो त्यांना खाऊन टाकील.

गीतरत्न ८:६ आपल्या हृदयाशी मला मुद्रेप्रमाणे ठेव, मुद्रेप्रमाणे मला आपल्या बाहूंवर ठेव; कारण प्रेम मृत्यूसारखे प्रबळ आहे; प्रेमसंशय अधोलोकासारखा निष्ठुर आहे; त्याची ज्वाला अग्निज्वालेसारखी, किंबहुना परमेशाने प्रदीप्त केलेला तो अग्नीच आहे.

एकदा पुन्हा जर आपण देवाच्या न्यायाचा विचार वधस्तंभाच्या प्रकाशात केला तर ती प्रक्रिया आपल्याला अगदी स्पष्टपणे दिसून येते. वधस्तंभावर येशूने सोसलेले शारीरिक दु:ख हे सैतानामुळे झाले होते; परंतु ख्रिस्ताने अनुभवलेले खरीखुरी आध्यात्मिक वेदना या कायद्याच्या दोषारोपामुळे आलेल्या अपराधपणामुळे होत्या. वधस्तंभाच्या वेळी अस्तित्वात असलेली एकमेव आग आणि गारपीट म्हणजे देवाच्या ज्वलंत व्यवस्थेचा प्रकाश होता, ज्यामुळे पापावर ठपका ठेवून पाप वाहन करणाऱ्यावर अपराधदंड आणला गेला. पण सैतानाने ख्रिस्तावरच्या या आध्यात्मिक दु:खाला झाकण्यासाठी त्याच्यावर वधस्तंभावरील शारीरिक छळ आणि यातना लादल्या. मग प्रश्न असा उपस्थित होतो की त्या २५० अधिपतींवरील या आध्यात्मिक ठपक्याला सैतानाने शारीरिक आगीने झाकले होते काय? की ते फक्त देवाच्या व्यवस्थेमुळे आलेल्या पापाच्या आणि अपराधदंडाच्या ठपक्यामुळेच मरण पावले?

त्यामुळेच असे म्हणता येईल की देवाची आग या २५० अधिपतींवर उतरली आणि देवाच्या वचनाद्वारे त्यांना त्यांच्या पापांचा ठपका ठेवला. जसे शलमोनाचे शहाणपण ह्या पुस्तकमध्ये लिहिले आहे:

शलमोनाचे शहाणपण १८:१५–२० "तुझे सर्वशक्तिमान वचन स्वर्गातून, तुझ्या राजसिंहासनातून, एक पराक्रमी योद्ध्यासारखे विनाशाच्या भूमीत उतरले. आणि त्याने तुझी खरी आज्ञा तीक्ष्ण तलवारीसारखी आणली, व उभे राहून सर्व गोष्टी मृत्यूने भरून टाकल्या; त्याने आकाशाला स्पर्श केला, तरीही तो पृथ्वीवर स्थिर उभा राहिला. मग अचानक भयंकर स्वप्नांच्या दर्शनांनी त्यांना फार त्रस्त केले, आणि अनपेक्षित भय त्यांच्यावर कोसळले. कोणीतरी इथे फेकला गेला, तर दुसरा तिथे, अर्धमृतावस्थेत आपल्या मृत्यूचे कारण दाखवत होता. कारण जी स्वप्ने त्यांना त्रस्त करीत होती ती

ह्या कारणासाठी होती की त्यांनी का शिक्षा भोगली ते न कळताच ते नाश पावू नयेत. होय, मृत्यूचा स्पर्श धार्मिकांनाही झाला, आणि वाळवंटात मोठ्या जमावाचा नाश झाला; पण तो कोप फार काळ टिकून राहिला नाही."

म्हणून जेव्हा त्या २५० अधिपतींनी पश्चात्ताप करण्यास नकार दिला आणि देवाने आपले देवदूतांचे रक्षण मागे घेतले, तेव्हा प्रश्न असा उभा राहतो की सैतानाने त्यांच्या या आध्यात्मिक संघर्षावर शारीरिक आगीचा पडदा टाकून त्यांना भस्म केले काय? की ते फक्त पापाच्या आणि देवाच्या व्यवस्थेच्या आध्यात्मिक प्रगटीकरणामुळेच नष्ट झाले? सहजपणे असे मानले जाते की जेव्हा हे अधिपती भस्म झाले तेव्हा ते राखेत रूपांतरित झाले असतील. परंतु नादाब आणि अबीहू यांच्या कथेतून आपण शिकतो की ज्या आगीने त्यांना भस्म केले, तिने त्यांच्या अंगावरील वस्त्रेदेखील जाळली नव्हती.

लेवीय १०:२-५ तेव्हा परमेश्वरासमोरून अग्नी निघाला व त्याने त्यांना भस्म केले; आणि ते परमेश्वरासमोर मरण पावले. ह्या बाबतीत मोशे अहरोनाला म्हणाला, “परमेश्वराने सांगितले ते हे : जे माझ्याजवळ येतील त्यांना मी पवित्र असल्याचे दिसून येईल आणि सर्व लोकांसमक्ष माझा गौरव होईल.” तेव्हा अहरोन चूप राहिला. मग अहरोनाचा चुलता उज्जीयेल ह्याचे मुलगे मीशाएल व एलसाफान ह्यांना मोशेने बोलावून सांगितले की, “तुम्ही इकडे येऊन तुमच्या बांधवांना पवित्रस्थानासमोरून उचलून छावणीबाहेर घेऊन जा.” मोशेने सांगितल्याप्रमाणे त्यांनी येऊन त्यांच्या अंगरख्यांसहित त्यांना उचलून छावणीबाहेर नेले.

जेव्हा देवाचा आत्मा उतरला, तेव्हा तो ख्रिस्ताच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या त्या प्रखर तेजोमय प्रकाशासारखा होता काय, जो त्याच्या दुसऱ्या येण्याच्या वेळी प्रकट होणार आहे?

प्रकटी १:१६ त्याच्या उजव्या हातात सात तारे होते; त्याच्या तोंडातून तीक्ष्ण दुधारी तलवार निघाली आणि त्याची मुद्रा ‘परमतेजाने’ प्रकाशणाऱ्या ‘सूर्यासारखी’ होती.

२ थेस्सल २:८ मग तो अनीतिमान पुरुष प्रकट होईल, त्याला प्रभू येशू ‘आपल्या मुखातील श्वासाने मारून टाकील’, आणि तो येताच आपल्या दर्शनाने त्याला नष्ट करील.

हा तोच प्रकाश होता काय, जो ढगातून चमकला आणि ज्याने त्या अधिपतींना भस्म करून टाकले? ते नेमके काहीही असो, परंतु आपण ख्रिस्ताच्या पृथ्वीवरील जीवनातून हे नक्कीच जाणतो की ख्रिस्ताने कधीही कुणालाही प्रत्यक्ष जाळून मारले नाही.

तरीदेखील आपण हे जाणतो की त्याने आपल्या तोंडातून निघालेल्या शब्दांनी ज्वलंत तलवार हाताळली होती.

नाणे संगमरवरी फरशीवर कोसळते आणि त्याचा आवाज जोरात घुमतो. त्याच्या अधिकारावर प्रश्न विचारण्याचे धाडस कुणी करत नाही. अन्यायाने मिळवलेला नफा गोळा करण्यासाठी थांबण्याचे धाडस कुणी करत नाही. येशू त्यांना दोऱ्यांच्या चाबकाने फटके देत नाही, पण त्याच्या हातातला तो साधा चाबूकच जणू ज्वलंत तलवारीसारखा भासतो. मंदिरातील अधिकारी, अंदाज बांधणारे याजक, दलाल, गुरेढोरे व्यापारी आपली मेंढी व बैल घेऊन त्याच्या उपस्थितीतील ठपक्यापासून सुटण्याच्या एका विचारानेच त्या ठिकाणाहून धावत निघून जातात. (DA 158)

आपल्यासमोर असलेल्या सर्व पुराव्यांवरून आपल्याला देवाच्या स्वभावाविरुद्ध हिंस्र विचार लादण्याची गरज नाही, किंवा सैतानाचे गुणधर्म देवावर आरोप करून असे म्हणण्याची आवश्यकता नाही की देवाने या माणसांना प्रत्यक्ष जाळून ठार केले. बायबल असे लिहिले गेले आहे की आपण देवाला न्यायासनावर उभे करू शकू आणि त्याच्या स्वभावाची परीक्षा घेऊ शकू. विचार करा एखाद्या पालकाला आपल्या हट्टी मुलांना शारीरिक यातना देऊन जिवंत जाळून टाकणे हे नैसर्गिक वाटेल काय? जर तुम्ही कधीही असे करणार नसाल, तर मग तुम्हाला काय वाटते की आपला स्वर्गीय पिता असे करील? आपण त्याच्यापेक्षा अधिक दयाळू आहोत काय? कदापि नाही! आपण जी कोणतीही दया दाखवतो ती त्याच्याकडूनच आलेली आहे.

## इस्राएलाच्या मंडळीला वाचवण्याचा प्रयत्न करणे

बंडखोरीतील नेत्यांच्या मृत्यूनंतरही ख्रिस्ताचा आत्मा उरलेल्या मंडळींना वाचवण्याचा प्रयत्न करीत होता.

इब्री लोकांच्या पुढे जाणारा देवदूत म्हणजेच येशू, त्यांना विनाशापासून वाचवू पाहत होता. क्षमा अजूनही त्यांच्या दारी उभी होती. देवाचा न्याय अगदी जवळ आला होता आणि त्यांना पश्चात्ताप करण्याचे आवाहन करीत होता. स्वर्गातून आलेल्या एका विशेष, हस्तक्षेपाने त्यांच्या बंडखोरीला अटकाव केला होता. आता, जर त्यांनी देवाच्या या दैवी हस्तक्षेपाला प्रतिसाद दिला असता, तर ते वाचले असते. पण जरी ते विनाशाच्या भीतीने न्यायापासून पळाले, तरी त्यांच्या बंडखोर वृत्तीवर उपचार झाले नव्हते. त्या रात्री ते आपल्या तंबूत परतले, हो, ते घाबरलेले होते, पण त्यांनी पश्चात्ताप

केलेला नव्हता. (RH, १२ नोव्हेंबर १९०३)

मोशेला पापाचा अपराधदंड वाटला नाही आणि त्याने परमेश्वराच्या शब्दावरून घाईघाईने पळ काढून मंडळीला नाशासाठी सोडले नाही, जसे इब्री लोक कोरह, दाथान आणि अबीराम यांच्या तंबूंमधून एक दिवस आधी पळाले होते. मोशे थांबला; कारण त्याला ठाऊक असूनही की त्यांच्या सततच्या बंडखोरीमुळे ते देवाच्या कोपाला पात्र ठरले आहेत, तरीही इतक्या विशाल जमावाला पूर्णपणे नाशासाठी सोडण्यास तो तयार नव्हता. लोकांना आत्मनम्रतेची काहीही जाणीव नव्हती म्हणून त्याने स्वतः देवापुढे लोटांगण घातले; लोकांना स्वतःसाठी विनंती करण्याची आवश्यकता वाटत नव्हती म्हणून त्याने त्यांच्या वतीने मध्यस्थी केली. येथे मोशे  ख्रिस्ताचे प्रतिरूप ठरतो. या निर्णायक प्रसंगी मोशेने आपल्या कळपाविषयी खऱ्या मेंढपाळाचे प्रेम आणि काळजी दाखवली. त्याने अशी विनंती केली की रागावलेल्या देवाच्या कोपाने त्याच्या निवडक लोकांचा पूर्ण नाश करू नये. आणि त्याच्या मध्यस्थीमुळे देवाच्या सूडाचा हात थांबविला गेला, त्यामुळे आज्ञाभंग करणाऱ्या आणि बंडखोर इस्राएलाचा संपूर्ण नाश झाला नाही. देवाचा कोप प्रकट झाला आणि महामारी सुरू झाली तेव्हा त्या भयंकर संकटाच्या वेळी काय करावे हे मोशेने अहरोनला दाखवून दिले. (3T 357, 358)

हे विसरू नये म्हणून, प्रेरणाद्वारे देवाच्या सूडाची व्याख्या कशी केली आहे?

जे लोक आपल्या सहकाऱ्यांशी वाईट वर्तन करतात आणि म्हणतात, "देवाला काय ठाऊक आहे?" त्यांना एक दिवस खूप काळ थांबलेला सूड सहन करावा लागेल. या काळात देवाविषयी नेहमीपेक्षा अधिक तुच्छता दाखवली जात आहे. माणसे गर्विष्टपणात आणि आज्ञाभंगात इतकी पुढे गेली आहेत की त्यांच्या अधर्माचा प्याला जवळजवळ पूर्ण भरला आहे हे स्पष्ट दिसून येते. अनेकजण दयेच्या सीमारेषेपलीकडे पोहोचले आहेत. लवकरच देव हे दाखवील की तो खरोखर जिवंत देव आहे. तो देवदूतांना सांगेल: "आता सैतानाशी त्याच्या विध्वंसाच्या प्रयत्नांमध्ये लढू नका. त्याला आज्ञाभंग करणाऱ्यांवर त्याचा दुष्टपणा प्रकट करू द्या; कारण त्यांच्या अधर्माचा प्याला पूर्ण भरला आहे. त्यांनी एका वाईटपणातून दुसऱ्या वाईटपणात प्रगती केली आहे, आणि त्यांनी रोज त्यांच्या आज्ञाभंगात भर घातली आहे. आता मी विध्वंसकाला त्याचे कार्य करण्यापासून थांबविण्यासाठी हस्तक्षेप करणार नाही." (RH, १७ सप्टेंबर १९०१)

मोशे आणि अहरोन यांनी मंडळीच्या जीवासाठी विनवणी केली. या दोघांना हे करण्यास प्रवृत्त करणारा ख्रिस्ताचाच आत्मा होता. आपल्या पित्याचे घर विभागलेले नाही.

ख्रिस्ताचा आत्मा एका बाजूला इस्राएली लोकांचा नाश होऊ नये म्हणून विनवणी करतो आणि त्याच वेळी ख्रिस्ताने हातात तलवार उगारून दुष्टांना ठार करण्याची धमकी दिली असे होऊ शकत नाही. या दोन संकल्पना परस्परविरोधी आहेत आणि ख्रिस्ताच्या व्यक्तिमत्त्वात त्यांचे सुसंगतीकरण होऊ शकत नाही. स्वतःविरुद्ध विभागलेले घर टिकू शकत नाही. आपला पिता एकाच वेळी वाचवतो आणि ठार करतो असे होऊ शकत नाही. गोड आणि कडू पाणी एकाच झऱ्यातून येऊ शकते का?

आपला पिता कोणाचाही नाश व्हावा अशी इच्छा धरत नाही; परंतु वारंवार दिलेल्या चेतावण्या आणि पश्चात्तापासाठी केलेल्या आवाहनानंतर तो अंधकाराला आपला चेहरा झाकू देतो. तरी इस्राएली लोकांच्या अंत:करणातली बंडखोरी सतत उफाळत राहिली.

गणना १६:४१-४९ दुसऱ्या दिवशी इस्राएल लोकांची सर्व मंडळी मोशे व अहरोन ह्यांच्याविरुद्ध कुरकुर करीत म्हणाली, “तुम्ही परमेश्वराच्या लोकांना मारून टाकले आहे.” मंडळीतील लोक मोशे आणि अहरोन ह्यांच्याविरुद्ध जमा झाल्यावर त्यांनी दर्शनमंडपाकडे नजर टाकली तेव्हा त्यावर मेघाने छाया केली असून परमेश्वराचे तेज प्रकट झाले आहे असे त्यांना दिसले. हे पाहून मोशे आणि अहरोन दर्शनमंडपासमोर गेले. तेव्हा परमेश्वर मोशेला म्हणाला, “तुम्ही ह्या मंडळीपासून दूर व्हा, म्हणजे एका क्षणात मी त्यांचा नाश करतो.” हे ऐकून ते पालथे पडले. मग मोशे अहरोनाला म्हणाला, “धुपाटणे घेऊन त्यात वेदीवरील अग्नी घाल व त्यावर धूप ठेवून ते ताबडतोब मंडळीकडे नेऊन त्यांच्यासाठी प्रायश्चित्त कर, कारण परमेश्वराचा कोप भडकला असून मरीची साथ सुरू झाली आहे.” मोशेच्या आज्ञेप्रमाणे अहरोन धुपाटणे घेऊन धावत मंडळीकडे गेला आणि लोकात मरीची साथ पसरत असल्याचे पाहून त्याने धूप घालून लोकांसाठी प्रायश्चित्त केले. मृत आणि जिवंत ह्यांच्यामध्ये तो उभा राहिला तेव्हा ती साथ थांबली. कोरहाच्या प्रकरणात जे मेले त्यांच्याव्यतिरिक्त मरीने चौदा हजार सातशे ऐंशी लोक मेले.

## मोशेच्या कार्याचे श्रेय सैतानाच्या प्रतिनिधित्वाला देणे

पश्चात्ताप करण्याऐवजी, इस्राएलाच्या मुलांनी कोरहाचा आत्मा घेतला आणि मोशे व अहरोन यांच्यावर आरोप केला की या सगळ्या लोकांचा मृत्यू तुम्ही घडवून आणला. आता आपण भविष्यवाणीच्या आत्म्यातील एका अत्यंत महत्त्वाच्या विधानाकडे येतो:

"पण कोरह आणि त्याचे साथीदार यांनी प्रकाश नाकारला, ते इतके आंधळे झाले की

देवाच्या सामर्थ्याची सर्वांत प्रभावी प्रगटीकरणेसुद्धा त्यांना पटवून देऊ शकली नाहीत; त्यांनी ती सर्व चिन्हे मानवी किंवा सैतानी कार्याला जोडली. हाच प्रकार लोकांनी केला. कोरह आणि त्याच्या साथीदारांच्या विनाशाच्या दुसऱ्या दिवशी ते मोशे आणि अहरोनकडे आले आणि म्हणाले, 'तुम्ही परमेश्वराच्या लोकांना ठार मारले.' त्यांच्या मार्गाबद्दल देव अप्रसन्न असल्याचा सर्वांत ठोस पुरावा म्हणजेच ज्यांनी त्यांना फसवले त्यांच्या विनाशाच्या रूपात त्यांना मिळूनही, त्यांनी धाडसाने देवाच्या न्यायालाही सैतानाशी जोडले, आणि असे जाहीर केले की वाईट शक्तीच्या सामर्थ्याने मोशे आणि अहरोन यांनी चांगल्या आणि पवित्र लोकांचा मृत्यू घडवून आणला. ह्याच कृतीने त्यांच्या नशिबावर शिक्कामोर्तब झाले. त्यांनी पवित्र आत्म्याविरुद्ध पाप केले होते असे पाप ज्यामुळे माणसाचे हृदय देवाच्या कृपेच्या प्रभावाविरुद्ध कायमचे कठीण होते." (PP 40)

हे विधान हा एक उत्कृष्ट कसोटी दगड आहे, जो ऐकणारे आणि वचनाचे पालन करणारे यांच्यातील फरक दाखवतो. आपल्या अभ्यासातून हे स्पष्ट झाले आहे की कोरह, दाथान आणि अबीराम यांना खड्ड्यात घेऊन जाण्याची परवानगी सैतानाला देण्यात आली होती. परंतु त्या २५० अधिपतींच्या बाबतीत हे स्पष्ट नाही की हे पुरुष आपल्या पापाच्या प्रगटीकरणामुळे आणि पश्चात्ताप नाकारल्यामुळे मेले होते, की त्याबरोबर सैतानाकडून आलेल्या शारीरिक अग्नीमुळेही त्यांचा मृत्यू झाला जे ख्रिस्ताच्या वधस्तंभावरील अनुभवाशी समांतर आहे. कोरह आणि त्याच्या साथीदारांनी इस्राएल लोकांना सांगितले होते की मोशेची संपूर्ण सेवा ही सैतानाच्या सामर्थ्याने होत आहे. याचा अर्थ असा की ते मानत होते की मोशे जे काही करत होता ते तो सैतानी शक्तीला आवाहन करून करत होता. त्याचा चेहरा तेजस्वी होणे, नियमशास्त्र देणे हे सर्व त्यांनी सैतानाच्या कार्यालाच जोडले.

जेव्हा परमेश्वराने कोरह आणि त्याच्या साथीदारांवरील आपले संरक्षण मागे घेतले, तेव्हा त्यांच्यावर जे न्याय आले त्यात मोशेचा काहीही संबंध नव्हता. हे कार्य करण्यासाठी त्याने सैतानाची शक्ती वापरली नव्हती. "जर" अशा प्रश्नांच्या माध्यमातून सैतानाने मोशेची परीक्षा घेतली होती, परंतु मोशेने या लोकांना ठार मारण्यासाठी सैतानाची शक्ती बोलावलेली नव्हती. त्याला त्याबद्दल काहीही माहिती नव्हती. देवाने या लोकांवर न्याय आणला, आणि त्याची न्याय देण्याची पद्धत अशी आहे:

"मला दाखविण्यात आले की देवाचे न्याय थेट परमेश्वराकडून त्यांच्यावर येत नाहीत,

परंतु अशा प्रकारे येतात: ते स्वतःला त्याच्या संरक्षणाबाहेर ठेवतात. तो चेतावणी देतो, दुरुस्ती करतो, दोष दाखवतो आणि सुरक्षिततेचा एकमेव मार्ग दाखवतो; परंतु जर जे त्याच्या विशेष काळजीखाली होते त्यांनी देवाच्या आत्म्याविना आपला मार्ग स्वीकारला, आणि वारंवार दिलेल्या चेतावण्यांनंतरही त्यांनी स्वतःचा मार्ग निवडला, तर मग तो आपल्या दूतांना सैतानाचे ठरवून केलेले हल्ले थांबवण्याची आज्ञा देत नाही." (14MR 3)

हा उतारा काळजीपूर्वक वाचणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कोरह लोकांना काय सांगत होता?

“…ते हे सर्व मानवी किंवा सैतानी कार्यालाच जोडत होते.” (PP 405)

संस्था या शब्दाबद्दल वेब्स्टर शब्दकोशामध्ये असे सांगितले आहे की - विशेषतः ठळक भाग लक्षात घ्या:

(संस्थेसाठी काम करणाऱ्या प्रतिनीधीची जबाबदारी किंवा पद म्हणजे इतराच्या गोष्टींची जबाबदारी स्वीकारणे; जसे प्रमुख व्यक्ती संस्थेचे खर्च भागवते.)

कोरह असे सुचवत होता की मोशे इस्राएलाविषयीच्या जबाबदाऱ्या सैतानाच्या संस्थेकडे सोपवत आहे. मोशेच्या कार्याला सैतानाशी जोडून, कोरह आणि त्याच्या साथीदारांनी क्षमाशून्य पाप केले.

जेव्हा सैतानाने या लोकांवर विनाश आणला तेव्हा तो मोशेचा प्रतिनीधी नव्हता, आणि तो देवाचाही प्रतिनीधी नव्हता. तो फक्त आपल्या स्वभावानुसार वागत होता, आणि देव स्वतःच्या स्वभावानुसार वागत होता. देवाचा आत्मा नाकारला गेला आणि म्हणून त्याने ज्या लोकांनी त्याला नाकारले त्यांच्याकडून आपली उपस्थिती मागे घेतली. यामुळे सैतानाला संधी मिळाली की त्याने या लोकांना ठार मारताना देवाच्या स्वभावावर स्वतःचे गुण चढवून दाखवले. पुन्हा या विधानाकडे नीट लक्ष द्या:

"त्यांच्या मार्गावर देव अप्रसन्न आहे याचा सर्वात ठोस पुरावा म्हणजे ज्यांनी त्यांना फसवले त्या लोकांच्या विनाशाच्या रूपात मिळाल्यानंतरही, त्यांनी धाडसाने देवाच्या न्यायालाच सैतानाशी जोडले, आणि असे जाहीर केले की वाईट शक्तीच्या सामर्थ्याने मोशे आणि अहरोन यांनी चांगल्या आणि पवित्र लोकांचा मृत्यू घडवून आणला." (PP 405)

जेव्हा इस्राएल लोकांनी मोशेवर हे कार्य सैतानाच्या सामर्थ्याने केल्याचा आरोप केला,

तेव्हा ते हे सिद्ध करू इच्छित होते की तो देवाचा न्याय नव्हता. तरीदेखील आपणास ठाऊक आहे की तो देवाचा न्यायच होता, पण त्या प्रक्रियेने ज्याद्वारे तो कार्य करतो आणि जी प्रेरणेने प्रकट झाली आहे. वारंवार चेतावणीनंतर परमेश्वराने आपला चेहरा लपविला. हाच तो मार्ग आहे ज्याद्वारे परमेश्वर आपले न्याय आणतो. दुसरे म्हणजे, इस्राएली लोकांनी असा आरोप केला की मोशेने देवाच्या इच्छेविरुद्ध सैतानाच्या माध्यमातून ही हत्या केली. हा आरोप पूर्णपणे खोटा होता. त्यांच्या विनाशाचे आयोजन करण्याशी मोशेचा काहीही संबंध नव्हता. जरी या उताऱ्याचा काही भाग वेगळा करून असे सुचवले जाऊ शकते की देवाने स्वतः या लोकांना ठार मारले आणि सैतानाने नाही

"त्यांच्या मार्गावर देव अप्रसन्न आहे याचा सर्वात ठोस पुरावा, ज्यांनी त्यांना फसवले त्या लोकांच्या विनाशाच्या रूपात, मिळाल्यानंतरही, त्यांनी धाडसाने देवाच्या न्यायालाच सैतानाशी जोडले..." (PP 405)

तरीसुद्धा या उताऱ्याचा संदर्भ आणि ख्रिस्ताच्या पृथ्वीवरील सेवाकार्यात देवाच्या स्वभावाबद्दल मिळालेला पुरावा आपल्याला दाखवतो की हे प्रत्यक्षात कसे घडले. या लोकांनी पश्चात्ताप करण्यास नकार दिल्यानंतर त्यांना नाश करणाऱ्याने नष्ट केले. जसा परमेश्वराने मिसरमध्ये आणि ईयोबाच्या प्रसंगात आपला हात पसरविला, त्याचप्रमाणे त्याने आपले संरक्षण मागे घेतले. "प्रत्येक मनुष्याने स्वतःच्या मनात पूर्ण खात्री करून घ्यावी." पण मी आणि माझे घराणे आम्ही त्या दयाळू आणि प्रेमळ देवाची सेवा करू, जो कृपा आणि सत्यामध्ये विपुल आहे आणि जो दोषीला निर्दोष ठरवणार नाही, तर प्रत्येकाला त्याच्या स्वतःच्या कृत्यांनुसार फळ प्राप्त होऊ देईल.

## शत्रूच्या हाती

दुर्दैवाने, लोकांनी ऐकण्यास नकार दिला आणि त्यांपैकी बऱ्याच जणांनी क्षमा न होणारे पाप केले.

त्यांनी पवित्र आत्म्याविरुद्ध पाप केले होते असे पाप की ज्यामुळे मनुष्याचे हृदय देवाच्या कृपेच्या प्रभावाविरुद्ध पूर्णपणे कठोर होते. ख्रिस्त म्हणाला होता: “जो मनुष्यपुत्राविरुद्ध एखादा शब्द बोलेल त्याला क्षमा मिळेल; परंतु जो पवित्र आत्म्याविरुद्ध बोलेल त्याला क्षमा केली जाणार नाही.” (मत्तय १२:३२). आपल्या तारणाऱ्याने हे शब्द तेव्हा उच्चारले होते जेव्हा त्याने देवाच्या सामर्थ्याने केलेल्या

कृपामय कार्यांना यहूद्यांनी बालझेबूलच्या कार्याशी जोडले. देव मनुष्याशी पवित्र आत्म्याच्या माध्यमातून संवाद साधतो; आणि जे जाणीवपूर्वक या सामर्थ्याला सैतानी म्हणून नाकारतात, ते आत्मा आणि स्वर्ग यांच्यामधील संवादाचा मार्ग पूर्णपणे तोडून टाकतात. (PP 405)

कृपया कुलपिता आणि संदेष्टे मधील पुढील परिच्छेद काळजीपूर्वक लक्षात घ्या:

देव आपला आत्मा प्रकट करून पाप्याला ताडतो आणि त्याला अपराधाविषयी पटवून देतो; आणि जर अखेरीस आत्म्याचे कार्य नाकारले गेले, तर त्या आत्म्यासाठी देव काही अधिक करू शकत नाही. दैवी दयेचा शेवटचा उपाय वापरून झाला आहे. अपराधी स्वतःला देवापासून तोडतो, आणि पापामध्ये स्वतःला बरे करण्याचे कोणतेही औषध नाही. देवाकडे अशी कोणतीही राखीव शक्ती नाही ज्याद्वारे तो पाप्याला खात्री पटवून त्याचे परिवर्तन करू शकेल. "त्याला सोडून दे" (होशे ४:१७) हा दैवी आदेश आहे. मग "पापांसाठी यापुढे बलिदान शिल्लक राहत नाही, पण न्यायाची आणि धगधगत्या क्रोधाची एक भयंकर अपेक्षा मात्र राहते, जी शत्रूंना भस्म करील." (इब्री १०:२६,२७). (PP 405)

आपल्या स्वर्गीय पित्याने लोकांना वाचवण्यासाठी शक्य ते सर्व केले, परंतु त्यांनी ऐकले नाही. शेवटी परमेश्वर म्हणतो: "त्यांना सोडून द्या." हाच तो क्रम आहे ज्याविषयी आपण बोलत आहोत.

देव राष्ट्रांशी लेखाजोखा ठेवतो. एक चिमुकले पाखरूही त्याच्या लक्षाविना जमिनीवर पडत नाही. जे लोक आपल्या सहकाऱ्यांशी दुष्टपणे वागतात व म्हणतात, "देवाला काय माहीत आहे?" त्यांना एक दिवस दीर्घकाळ रोखून धरलेला सूड भोगावा लागेल. या काळात देवाविषयी असामान्य अशी तुच्छता दाखवली जात आहे. मनुष्य गर्विष्ठपणा आणि आज्ञाभंगाच्या अशा टप्प्यावर पोहोचला आहे की त्यांचा अधर्माचा प्याला जवळजवळ भरून गेला आहे. अनेकजण दयेच्या मर्यादेपलीकडे गेले आहेत. लवकरच देव दाखवेल की तो खरोखरच जिवंत देव आहे. तो देवदूतांना म्हणेल: "सैतानाशी त्याच्या नाश करण्याच्या प्रयत्नांत आता लढू नका. त्याला त्याची दुष्टता आज्ञाभंग करणाऱ्या मुलांवर ओतू द्या; कारण त्यांच्या अधर्माचा प्याला पूर्ण झाला आहे. त्यांनी एका अधर्माच्या पायरीवरून दुसऱ्या पायरीकडे प्रगती केली आहे, आणि दररोज त्यांच्या बेकायदेशीरतेमध्ये भर घातली आहे. मी आता पुढे हस्तक्षेप करणार नाही की नाश करणाऱ्याला त्याचे कार्य करण्यापासून रोखावे." (RH सप्टेंबर १७, १९०१)

वरील उतारा पुढील उताऱ्यासाठी योग्य संदर्भ देतो की देवाचा सूड म्हणजे नेमके काय.

देवाला सूड घेण्यात आनंद नाही, तरीही तो आपल्या नियमभंग करणाऱ्यांवर न्यायनिवाडा करील. पृथ्वीवरील रहिवाशांना पूर्ण अधःपतन आणि नाशापासून जपण्यासाठी त्याला हे करणे भाग पाडते. काहींना वाचविण्यासाठी त्याला त्यांना छाटून टाकावे लागते जे पापात कठोर झाले आहेत. (PP 628)

मंडपात एक साथरोग पसरू लागला. वचन आपल्याला स्पष्ट सांगतात की असा साथरोग सुरू झाल्यावर नेमके काय घडते:

लेवीय २६:२५ मी तुमच्यावर तलवार आणीन, ती करार मोडल्याचा बदला घेईल; तुम्ही आपापल्या नगरात जमा व्हाल, तेव्हा मी तुमच्यावर मरी पाठवीन; मी तुम्हांला तुमच्या शत्रूच्या स्वाधीन करीन.

इस्राएली लोकांनी जेव्हा कराराचा तिरस्कार केला आणि त्याला नाकारले, तेव्हा प्रभूने त्यांना तलवारीचा आणि रोगराईचा सामना करण्यास परवानगी दिली. या वचनाच्या शेवटच्या भागात स्पष्ट सांगितले आहे की प्रभू त्यांना शत्रूच्या हाती सोपवून देईल.

सैतान आपली सत्ता चालवतो. तो पिकलेले पीक उध्वस्त करून टाकतो, आणि त्यानंतर दुष्काळ व क्लेश येतात. तो हवेत घातक विष सोडतो, आणि हजारो लोक रोगराईने मृत्युमुखी पडतात. (GC 590)

इस्राएलच्या संरक्षणाच्या भिंतीत एक भेग पडली होती, आणि सैतानाला लोकांच्या मंडपात रोग पसरविण्याची मुभा मिळाली. पाहा, यावर मोशे आणि अहरोन कशी प्रतिक्रिया देतात:

गणना १६:४५-४८ “तुम्ही ह्या मंडळीपासून दूर व्हा, म्हणजे एका क्षणात मी त्यांचा नाश करतो.” हे ऐकून ते पालथे पडले. मग मोशे अहरोनाला म्हणाला, “धुपाटणे घेऊन त्यात वेदीवरील अग्नी घाल व त्यावर धूप ठेवून ते ताबडतोब मंडळीकडे नेऊन त्यांच्यासाठी प्रायश्चित्त कर, कारण परमेश्वराचा कोप भडकला असून मरीची साथ सुरू झाली आहे.” मोशेच्या आज्ञेप्रमाणे अहरोन धुपाटणे घेऊन धावत मंडळीकडे गेला आणि लोकात मरीची साथ पसरत असल्याचे पाहून त्याने धूप घालून लोकांसाठी प्रायश्चित्त केले. मृत आणि जिवंत ह्यांच्यामध्ये तो उभा राहिला तेव्हा ती साथ थांबली.

जसे आपण याआधी पाहिले, प्रभू मोशे आणि अहरोनाशी जुन्या कराराच्या भाषेत बोलतो. तो लोकांनी मरणास पात्र असल्याचा निकाल सांगतो. पण तो स्वतः तो निकाल अमलात आणण्यासाठी नाही, तर मोशे आणि अहरोन यांनी लोकांसाठी ख्रिस्ताच्या आत्म्यात दया मागावी यासाठी हे करतो. पुन्हा एकदा, शलमोनाचे ज्ञान

या ग्रंथामध्ये अहरोनने विध्वंसकाच्या विरोधात उभे राहून केलेल्या कार्याबद्दल आपल्याला पाहायला मिळते.

शहाणपणाचे पुस्तक १८:२१-२५ त्या वेळी निर्दोष मनुष्य त्वरेने पुढे आला आणि लोकांचे रक्षण करण्यासाठी उभा राहिला; त्याने आपल्या सेवाकार्याचे ढाल घेतले, म्हणजे प्रार्थना आणि धुपाचे प्रायश्चित्त, आणि तो कोपाविरुद्ध उभा राहिला व संकटाला थांबविले, असे दाखवून दिले की तो तुझा सेवक आहे. त्याने विध्वंसकावर विजय मिळविला, शरीराच्या ताकदीने नाही, शस्त्रांच्या जोरावरही नाही, तर एका शब्दाने त्याला वश केले जो शिक्षा करीत होता, आणि पितरांबरोबर केलेल्या शपथा व करार यांचा दाखला देऊन. कारण जेव्हा मृतदेह एकावर एक पडून ढिगारे तयार झाले होते, तेव्हा तो मध्ये उभा राहिला, कोप थांबविला आणि जिवंतांसाठी मार्ग खुला केला. कारण त्याच्या लांब वस्त्रात संपूर्ण जग होते, आणि दगडांच्या चार ओळींमध्ये \[छातीवरील पट्ट्यात] पितरांचा गौरव कोरलेला होता, आणि त्याच्या शिरोभूषणावर तुझा वैभव होता. या सर्वांसमोर विध्वंसक मागे हटला आणि घाबरला; कारण हेच पुरेसे होते की त्यांनी केवळ कोपाचा स्वाद घेतला.

अहरोनने देवाच्या वचनांचा आधार घेत, नवीन अथवा सार्वकालिक कराराच्या भाषेत विनवणी करून विध्वंसकावर विजय मिळविला. यामुळे विध्वंसक भयभीत झाला आणि त्याला मागे हटावे लागले.

सैतान दोषारोप करील आणि नाश करण्यासाठी परवानगी मागेल, पण आसऱ्याचे दार उघडणारा देवच आहे. त्या दारात प्रवेश करणाऱ्याला निर्दोष ठरविणारा देवच आहे. (OFC 283)

दुर्दैवाने, १४,७०० लोकांनी त्या आसऱ्यात प्रवेश करण्यास नकार दिला आणि विध्वंसकाच्या हातून आपले प्राण गमावले. कोरह आणि त्याच्या मित्रांच्या बंडखोरीमुळे आपल्याला त्या युद्धाची खिडकी उघडते जी स्वर्गात सुरू झाली होती, आणि सैतान किती चलाख व कपटी आहे हे दाखवते की तो आपल्या इच्छांच्या पूर्तीत अडथळा आणणारी प्रत्येक गोष्ट फसवून आणि नष्ट करून टाकतो.

माझी मनापासूनची प्रार्थना आहे की या कथेत तुम्हाला आपल्या स्वर्गीय पित्याच्या हृदयातील दया आणि प्रेम दिसेल. तो कोणाचाही नाश व्हावा असे इच्छित नाही, आणि जेव्हा लोक स्वार्थामुळे स्वतःला सैतानाच्या अधीन करून घेतात आणि शेवटी त्याच्याच हातून नाश पावतात, तेव्हा देवाला फारच दुःख होते. मग हे किती कठीण आहे की लोक तारणाऱ्याकडे सुरक्षिततेसाठी धावत येतील, जेव्हा त्यांना असे वाटते की

जर त्यांनी त्याच्या आवाहनाला प्रतिसाद दिला नाही, तर त्याच्या हातात असलेल्या शस्त्राने तो त्यांचा नाश करील! परंतु जे सर्व विश्वासाने पित्याला आपल्या पूर्ण अंतःकरणाने शोधतात ते हे अनुभवतील की देव खरोखरच प्रेम आहे. यामुळे हे सिद्ध होते की त्याचे राज्य हे बल, दडपशाही आणि नियंत्रण यांचे राज्य नसून प्रेम, स्वातंत्र्य आणि आनंद यांचे राज्य आहे.

# कोरहचा बंड

कोरह, दाथान आणि अबीराम यांना जिवंत खाली भूमीत कोणी पाठवले?

गणना १६:३१-३३ हे त्याचे सगळे शब्द बोलून संपतात न संपतात तोच त्यांच्या पायांखालची भूमी दुभंगली. आणि पृथ्वीने आपले तोड उघडून ते, त्यांची कुटुंबे, कोरहाची सगळी माणसे व त्यांची सर्व मालमत्ता गिळून टाकली. ह्याप्रमाणे ते व त्यांचे सर्वस्व अधोलोकात जिवंत उतरले. पृथ्वीने त्यांना गडप केले आणि मंडळीतून ते नष्ट झाले.

आणि मग आपण या विधानांबद्दल काय म्हणायचे?

कोरह आणि त्याच्या साथीदारांनी प्रकाश नाकारला, आणि इतके आंधळे झाले की देवाच्या सामर्थ्याची अगदी ठळक आणि जबरदस्त प्रकटीकरने देखील त्यांना पटवून देण्यासाठी पुरेशी ठरली नाहीत. त्यांनी त्या सर्व कार्याला मानवी किंवा सैतानी शक्तीचे कार्य मानले. हेच लोकांनी केले, जे कोरह आणि त्याच्या मंडळीचा नाश झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी मोशे व अहरोन यांच्याकडे आले आणि म्हणाले: “तुम्ही परमेश्वराच्या लोकांचा वध केला आहे.” जरी त्यांच्या डोळ्यासमोर त्यांना फसवणाऱ्यांचा विनाश झाला होता आणि यात देवाचा रोष असल्याचा सर्वांत स्पष्ट आणि खात्रीशीर पुरावा होता तरीदेखील त्यांनी धाडसाने देवाच्या न्यायांना सैतानाशी जोडले. त्यांनी असे जाहीर केले की वाईट शक्तीच्या सामर्थ्याने मोशे आणि अहरोन यांनी चांगल्या आणि पवित्र पुरुषांचा वध केला. हेच ते कृत्य होते ज्याने त्यांचा अंत निश्चित केला. त्यांनी पवित्र आत्म्याविरुद्ध पाप केले होते ते पाप ज्यामुळे मनुष्याचे हृदय दैवी कृपेच्या प्रभावापासून पूर्णपणे कठोर बनते. (PP 405)

आणि या विधानाचे काय?

कोरह, दाथान आणि अबीराम यांच्या प्रकरणात आपल्याला एक इशारा देणारा धडा आहे, म्हणजे आपण त्यांचा आदर्श अनुसरू नये. “ख्रिस्ताची परीक्षा घेऊ नका, जसे त्यांच्यापैकी काहींनी परीक्षा घेतली आणि सर्पादवारे नाश पावले. तसेच कुरकुरू नका, जसे त्यांच्यापैकी काहींनी कुरकुर केली आणि विध्वंसकाने त्यांचा नाश केला. ह्या सर्व गोष्टी त्यांना आदर्श म्हणून घडल्या; आणि त्या लिहिल्या गेल्या आहेत आपल्या चेतावणीसाठी, ज्यांच्यावर जगाच्या शेवटच्या काळाचे दिवस आले आहेत.” (3T 353)

मग आपण या विधानांचे एकमेकांशी कसे सामंजस्य घालायचे, तेही येशू ख्रिस्तामध्ये प्रकट झालेल्या देवाच्या स्वभावाच्या प्रकाशात? जर आपण आपल्या पित्याचा शोध पूर्ण अंतःकरणाने घेतला, तर आपल्याला तो नक्कीच सापडेल. आपण नियमाचे फक्त ऐकणारे न होता करणारे होऊ या नाहीतर आपण स्वतःलाच फसवू.